अमृतमहोत्सवी वर्ष

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६४, अंक १, शक १९०७
जुलै १९८५

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 64, No. 1, July 1985

अमृतमहोत्सवी वर्ष

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६४, अंक १, शक १९०७

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 64, No. 1, July 1985

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source material available in different languages, and also research articles elating to various aspects of Indian history and culture.

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्याच्या नियमानुसार अनुदान मिळालेले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक : मा. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

———

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : १, जुलै १९८५

भारतीय हस्तलिखितांचे सर्वेक्षण

ना. बा. मराठे
पुणे

भारतीय लेखनाचा प्राचीन कालापासून सर्वसामान्य विश्वासार्ह इतिहास उपलब्ध नाही. काही फुटकळ अनुमाने भाषाविदांनी काढली आहेत. दुसरे विश्वासार्ह पुरावे मिळेपर्यंत त्याच पुराव्यावर भरवसा ठेवून राहावे लागते. पाणिनीने 'यवनाल्लिप्याम्' असे सूत्र लिहून 'यवनानी लिपी' होती, हे सिद्धच केले आहे. पाणिनीचा सर्वांना मान्य असलेला काळ इ. स. पू. चौथे शतक मानला जातो. पाणिनीने आपल्या सूत्रांतून त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या २४ शब्दप्रभूंचा उल्लेख नावनिशीवार दिला आहे. शौनक, कात्यायन, यास्क यांच्या कृती तर अभ्यासकांच्या पुढे उपलब्धच आहेत. सूत्रकाळातील कित्येक सूत्रकारांनी दिलेले लेखनाचे संदर्भ या संदर्भात लक्षात घ्यायलाच हवेत. पण प्रत्यक्ष लिखित स्वरूपात उपलब्ध असलेला सोहगोरचा ताम्रपट हा सर्वात जुना भारतीय लेख इ. पू. ३५० चा मानला जातो. त्यानंतरचे शिलालेख, ताम्रपट अनेक उपलब्ध आहेत. त्यांचे रीतसर वाचनही झालेले आहे. सम्राट अशोकाचे (इ. स. पूर्व २६६–२३७ मधील) एकूण ३५ शिलालेख (आज्ञापत्रे) उपलब्ध आहेत. त्यांपैकी दोन लेख खरोष्ट्रीतील आहेत, तर कंदाहारमध्ये ग्रीक व अरॅमिक लिप्यांत लिहिलेले दोन लेख सापडले आहेत. तक्षशिला येथील उत्खननात सापडलेला खरोष्ट्री लिपीतीलच चांदीच्या तबकडीवर लिहिला गेलेला लेख हा इ. स. १ ल्या शतकातील आहे. तर सांचीच्या स्तूपावरील सर्वात जुना लेख हस्तिदंतावर कोरलेला आहे. हा इ. स. पूर्व १७५ मधील असावा असा तज्ज्ञांचा कयास आहे. प्रिन्सेपने (१८३६–४०) ब्राह्मी लिपीचे वाचन करून लिपीशास्त्रात फार महत्त्वाची भर घातली, तर डॉ. ब्यूलरने भारतीय प्राचीन लिपीशास्त्राचा शास्त्रशुद्ध पाया घातला. प्राचीन भारतीय लिपीचा कसकसा विकास झाला याचा आलेखच कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममध्ये रेखाटून ठेवलेला आहे. मध्ययुगीन भारतात वेगवेगळ्या भूप्रदेशांत ब्राह्मीतून विकसित झालेल्या लिप्यांचा शास्त्रसिद्ध अभ्यास त्यामुळे अभ्यासकांच्या पुढे आला आहे.

भारतीय हस्तलिखितांचे सर्वेक्षण या प्रस्तुत विषयाला उपोद्घात म्हणून वर दिलेली माहिती पुरेशी आहे. भारतात जी हस्तलिखिते आज वेगवेगळ्या हस्त-

लिखितांच्या संग्रहालयांत उपलब्ध आहेत, त्यांच्या लिप्याही नानाविध आहेत, हे विद्वानांना ठाऊक आहे. शारदा, मागधी, ग्रंथ, देवनागरी, मोडी, महाजन, फार्सी आदी नाना लिप्यांतून ती हस्तलिखिते लिहिलेली आहेत. ताडपत्रे, भूर्जपत्रे, हातमाग कागद, वस्त्रे, शिला, विटा, तांबे, रुपे, कातडे, हस्तिदंत आदी वस्तू लिहिण्याची साधने म्हणून वापरल्या गेल्या आहेत. संस्कृत–पाली–प्राकृत–अपभ्रंश आदी प्राचीन भाषांतून जशी हस्तलिखिते लिहिली गेली आहेत, तशी ती मध्ययुगीन कालात आधुनिक भारतीय प्रमुख १४ भाषांतून व अनेक उपभाषांतूनही लिहिली गेली आहेत. भाषानिहाय राज्यव्यवस्था येऊन वीस वर्षे होत आली, तरी त्या त्या भाषांतून विखुरलेल्या हस्तलिखितांची बुद्धिपुरस्सर जमवाजमव करून त्यांचे एकत्र संरक्षण वा जतन करण्याचे शिस्तशीर प्रयत्न राज्यसरकारांमार्फत केले जात आहेत असे ऐकिवात नाही.

परके ब्रिटिश लोक हिन्दुस्थानात आले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की भारतीय संस्कृती फार प्राचीन असून भारतीयांनी वेगवेगळ्या विषयांवर लेखनही विपुल प्रमाणात केलेले आहे. एवढेच काय, येथील संस्थानिकांनी–मठाधिपतींनी–विद्वानांनी या लेखसंपत्तीचे प्राणपणाने जतन केले आहे व त्याचा शोध घेतला पाहिजे. इ. स. १४९८ साली भारताशी वास्को–डि–गामाने दर्यावर्दी दळणवळण साधण्यापूर्वीच अरबांमार्फत भारतीय संस्कृतीच्या कथोपकथा युरोपमध्ये पोचल्या होत्या. मिशनऱ्यांनीही या कामी हातभार लावला होता. ३१ डिसेंबर १६०० साली ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीने अधिकृतरीत्या भारतात आपली कंपनी स्थापन केली आणि आपल्या व्यापाराला चालना दिली. जसजसे दळणवळण वाढले, देवाणघेवाण वाढली, सांस्कृतिक आदान–प्रदान होऊ लागले, तसतसे युरोपमधील विद्वानांमध्ये येथील लेखनाबद्दल कुतूहल वाढू लागले. त्यांतच सर विल्यम्स् जोन्ससारख्या न्यायाधिशाने संस्कृत भाषा ही ग्रीक किंवा लॅटिन या युरोपियन प्राचीन भाषांइतकीच किंवा काकणभर अधिकच समृद्ध आहे असे आवर्जून जगाला सांगितले तेव्हापासून, किंवा त्याही अगोदर येथील संस्कृत हस्तलिखितांची वाड युरोपमध्ये जाऊ लागली. संस्कृत भाषेचे पद्धतशीर अध्ययन–अध्यापन पॅरिस, बर्लिन आदी प्रगत शहरांतून सुरू झाले. भारतातील संस्कृत–प्राकृत भाषांतील ग्रंथांच्या प्रतिलिप्या केल्या जाऊन त्या युरोपमध्ये पोचू लागल्या. सर रॉबर्ट चेंबर्स याने इ. स. १७७४ सालापासूनच प्राचीन हस्तलिखिते गोळा करण्याची जोरदार मोहीम सुरू केली. त्याने गोळा केलेली संस्कृत–प्राकृत हस्तलिखिते बर्लिनच्या ग्रंथालयांत अजूनही सुरक्षित आहेत. त्यांची सूची पुढे कित्येक वर्षांनी (इ. स. १८५३) डॉ. वेबर यांनी प्रसिद्ध केली.

यानंतरचा मोठा प्रयत्न कर्नल कोलिन मॅकेंझी या ईस्ट इंडिया कंपनीच्या

तरुण एंजिनियरने इ. स. १७९६–१८०६ च्या दरम्यान केला. दक्षिण भारत, लंका, जावा, सुमात्रा इत्यादी भागांतील संस्कृत-प्राकृत हस्तलिखितेच नव्हेत, तर शिलालेख, ताम्रपट आदी ऐतिहासिक पुराव्यांचे अस्सल नमुने प्रचंड प्रमाणात त्याने गोळा केले. पुढे ते कंपनी सरकारने विकत घेतले आणि मद्रासला एक प्राचीन वस्तुसंग्रहालयच उघडले. डॉ. एच्. एच्. विल्सन यांनी त्यांची सूची इ. स. १९२८ मध्ये प्रसिद्ध केली. सध्या या संग्रहालयाचा काही भाग मद्रासच्या प्राच्यविद्या पुस्तकालयात तर काही भाग कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात पहावयास सापडतो, तर उर्वरित अंश लंडनमधील इंडिया ऑफिसमध्ये ठेवला गेला आहे. कर्नल मॅकेंझीनंतर डॉ. लीड्स् जोन्स् यांनीही असाच हस्तलिखित पोथ्या गोळा करण्याचा उद्योग आरंभिला. पी. सी. ब्राऊन, पिक्फोर्ड, डॉ गुस्ताव ओपर्ट, कुप्पुस्वास्मीशास्त्री, पी. पी. एस्. शास्त्री आदी अनेक विद्वानांनी पोथ्या गोळा करण्याचे कार्य केले. आज मद्रास–संग्रहालयात सुमारे पन्नास हजार पोथ्यांचा संग्रह आहे. इ. स. १९१० साली येथील पोथ्यांची २८ भागांत विवरणात्मक सूची प्रसिद्ध झाली. शिवाय तमिळ, उर्दू, फार्सी, कन्नड आदी भाषांतील हस्तलिखित पोथ्यांचीही सूची प्रसिद्ध झाली आहे.

भारतातील हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह करण्याचे हे काम एकोणिसाव्या शतकात बऱ्याच प्रमाणात वाढीला लागले. यात संस्कृतवेत्ते, आंग्लविद्याविभूषित पाश्चात्य तथा भारतीय पंडित होते. थॉमस् कोलब्रुक्, विंटरनिझ्, इग्मीक, एटगार्टन आदींनी गोळा केलेल्या पोथ्या इंडिया ऑफिस लायब्ररी, ऑक्सफर्ड, बर्लिन लायब्ररी आदी ठिकाणी जमा आहेत. या विद्वानांनी तयार केलेल्या विवरणात्मक सूच्यांच्या प्रस्तावनांमधून, त्यांना पोथ्या गोळा करताना आलेली विघ्ने व पडलेला त्रास यांची नोंद सापडते. भारतातील हस्तलिखित पोथ्या राजरोसपणे भारताबाहेर चालल्या आहेत याची खंत सामान्यजनांना लागणे शक्य नसले, तरी विद्वानांच्या चाणाक्ष नजरेतून ही गोष्ट सुटू शकली नाही. लाहोर येथील राधाकृष्ण नावाच्या एका पंडिताने ही गोष्ट एक पत्र लिहून तत्कालीन भारत सरकारच्या नजरेस आणून दिली. त्यावेळी व्हिटले स्टॉक नावाचा भारत सरकारचा सेक्रेटरी होता. त्याने राधाकृष्णाच्या पत्राची दखल घेतली आणि इ. स. १८६८ मध्ये एक फर्मान जारी केले. भारतातील प्रांतोप्रांती असणाऱ्या सर्व प्रकारच्या हस्तलिखित ग्रंथांचा त्या फर्मानामुळे शोध सुरू झाला. मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे संग्रहालये स्थापन झाली आणि हजारो पोथ्या तेथे जमा होऊ लागल्या. या कामी डॉ. किलहॉर्न, डॉ. ब्यूलर, सर रामकृष्णपंत भांडारकर, डॉ. पीटर्सन्, भगवानलाल इन्द्र, ई. हर्झ्, याकोबी या पंडितांनी रस घेतला आणि आता त्या त्या संग्रहालयात जमा झालेल्या पोथ्यांच्या विवरणात्मक सूचीही उपलब्ध झाल्या आहेत.

थिओडोर आल्फ्रेच्‌ची कामगिरी

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास या हस्तलिखित पोथ्यांच्या विवरणात्मक सूची तयार होऊन प्रसिद्ध होऊ लागल्या, तसतशी विद्वान संशोधकांची कुतूहल-बुद्धी अधिकाधिक जागृत होऊ लागली. या जिज्ञासावृत्तीतून आल्फ्रेच्‌ने अशा सुमारे ५६ तयार झालेल्या सूची मिळविल्या आणि या सूचींची सूची तयार करण्याचे क्लिष्ट काम कित्येक वर्षे खपून पूर्ण केले. ७९५ पृष्ठे भरतील एवढी सामग्री तयार करून तत्कालीन भारत सरकारच्या (ब्रिटिश) आर्थिक साहाय्याने १८९१ साली 'कॅटलॉगस् कॅटलॉगरम्' या नावाने संस्कृत हस्तलिखित पोथ्यांची ही बृहत्सूची प्रसिद्ध झाली. इ. स. १८९६ साली त्यांने आणखी २० सूची मिळवून बृहत्सूचीची पुरवणी, इ. स. १९०३ साली प्रसिद्ध केली. या पुरवणीचीही १६१ पृष्ठे भरली. भारतीय विद्याशाखेचा (इंडोलॉजी) विस्तार झाला असल्याने इ. स. १९६२ साली जर्मन कौन्सिलने त्या सूचीचे पुनर्मुद्रण करून जगातील भारतीय विद्यांचे जेथे जेथे संशोधन चालते तेथे तेथे ही बृहत्सूची संदर्भ-साधन म्हणून उपयोगी पडावी या सद्धेतूनें उपलब्ध करून दिली. या बृहत्सूचीचा केवढा उपयोग होतो याची संशोधकांना कल्पना आहेच.

हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह करण्याचे हे काम तसे क्रमशः पुढे चालूच राहिले. यात राजेंद्रलाल मित्र, हरप्रसादशास्त्री, डॉ. रघुवीर, राहुल सांकृत्यायन आदी अनेक संशोधनप्रिय विद्वानांनी जेथे जेथे जुने हस्तलिखित ग्रंथ मिळतील ते हस्तगत करून त्यांची जोपासना, संरक्षण करण्यासाठी अधिक प्रयत्न चालूच ठेवले. राहुल सांकृत्यायनांनी तिबेटमध्ये जाऊन बौद्धधर्म व बौद्ध तत्त्वज्ञान या विषयांना वाहिलेल्या कित्येक हस्तलिखित पोथ्या उंटांवर लादून भारतात आणल्या. नालंदा येथेच नालंदा महाविहारामध्ये या पोथ्यांचा संग्रह केला गेला असून त्यांचे संशोधन करून चिकित्सित आवृत्ती तयार करण्याचे काम तेथे चालू आहे. असे म्हणतात की इ. स. ८०० च्या सुमारास बखत्यार खिलजीच्या विध्वंसक कृत्यांना घाबरून कित्येक बौद्ध पंडित आपापल्या पोथ्या सांभाळीत तिबेटमध्ये आश्रयासाठी गेले. तेथे सभोवती बौद्ध स्तूप उभारून स्तूपाचे आत सुरक्षित राहाव्या म्हणून या धर्म-ग्रंथांच्या पोथ्या ठेवण्यात आल्या. तिबेटच्या थंड हवेत, त्या वातानुकूलित घरात राहाव्या तशा आजतागायत सुरक्षित राहिल्या. कर्मधर्मसंयोगाने जुनाट झाल्याने एक स्तूप पडला असता या ताडपत्रावर लिहिलेल्या पोथ्या उजेडात आल्या. तेथील जाणत्या लोकांनी त्या राहुल सांकृत्यायनांच्या हवाली केल्या. म्हणून आता विरोचन रक्षित, रत्नाकरशांती, ज्ञानश्रीमित्र, रत्नवज्र, अभयंकरगुप्त तथागतरक्षित, असंग आदी अनेक बौद्ध पंडितांनी लिहिलेल्या मूळ ग्रंथांच्या हस्त-लिखित ताडपत्रांवरील पोथ्या उजेडात येऊ शकल्या. दीपंकर श्रीविज्ञान यांना

धर्मसभा भरविण्यासाठी तिबेटमध्ये बोलावण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी आपल्याबरोबर सुमारे दोनशे पोथ्या नेल्या होत्या. राहुल सांकृत्यायनांच्या चिकाटीच्या प्रयत्नामुळे हा ग्रंथनिविष्ट ज्ञानसंपदेचा साठा पुनश्च भारतात येऊ शकला. गेल्या दोनशे वर्षांत या संशोधकांच्या अखंड परिश्रमांमुळे प्राचीन पोथ्यांतून अक्षरसंनिविष्ट झालेला ज्ञानसंग्रह जगातील संशोधकांना उपलब्ध झालेला आहे. केवढे हे त्यांचे उपकार आहेत आधुनिक संशोधकांवर !

डॉ. व्ही. राघवन् यांची कामगिरी

थिओडोर आल्फ्रेंच्ने केलेल्या अद्वितीय कामगिरीतून स्फूर्ती घेऊन पंजाब युनिव्हर्सिटीचे कुलपती असलेले प्रसिद्ध डॉ. वुल्नर यांनी मद्रास विद्यापीठाला, ' कॅटलॉगस् कॅटलॉगरम्ची जंत्री अपुरी आहे; तिची सुधारित आवृत्ति काढावी, ' अशी सूचना इ. स. १९३५ साली केली. त्या वेळचे संस्कृतशाखेचे प्रमुख डॉ. सी. कुन्हन् राजा यांना ती कल्पना पसंत पडली आणि त्या कामी डॉ. व्ही. राघवन् यांची मदतनीस म्हणून त्यांनी नेमणूक करून घेतली. मात्र पहिला ' न्यू कॅटलॉगस् कॅटलॉगरम् ' चा ' अ ' या अक्षराचा खंड बाहेर पडायला इ. स. १९४८ साल उगवले. कारण उघड आहे. ही सुधारित आवृत्ती असल्याने तत्कालपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ३९७ हस्तलिखित पोथ्यांच्या सूचींचा परामर्श – त्या गोळा करण्यापासून त्यांचा अकारानुक्रमे क्रम लावण्यापर्यंत – त्यांना घ्यावा लागला. एवढेच काय, इ. स. १९४८ मध्ये पहिला खंड प्रकाशित झाल्यावर दुसरा खंड प्रकाशित व्हावयाला इ. स. १९६५ साल उगवले. मात्र या सुमारास यांत इतर अनेक सुधारणांचा अन्तर्भाव करण्यात आला. आल्फ्रेच् मुद्रित सूचीच्या बाहेरील विशेष माहिती देत नसे, ती यात येऊ लागली. उदाहरणार्थ, ' कृष्णलीला तरंगिणी ' याचा, हे एक नाटक आहे, एवढाच उल्लेख आल्फ्रेच्च्या कॅ. कॅ. मध्ये सापडतो; तर न्यू कॅ. कॅ. मध्ये त्याबद्दलची इतर माहितीही नमूद आहे. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीही नमूद न केलेली माहिती न्यू कॅ. कॅ. ने दिली आहे. ते एक १२ तरंग असलेले काव्य आहे. लेखक शिवरामानंदाचा शिष्य नारायणतीर्थ असून ते एन्. व्ही. फेस्टिव्हल् सिलेक्शन कमिटीने इ. स. १९६५ साली छापून तंजावर येथे प्रसिद्ध केले आहे. एवढेच नव्हे तर या काव्यावरील परीक्षण लेख ' रूपलेखा ' या नियतकालिकाच्या सव्विसाव्या खंडात पृ. ६८–७१ वर दिला आहे. या काव्याच्या तेलगू व ग्रंथम् लिप्यांतील पोथ्या कोणत्या ग्रंथसंग्रहालयात उपलब्ध आहेत याचीही नोंद न्यू. कॅ. कॅ. करायला विसरलेला नाही. म्हणजे भारतीय हस्तलिखित पोथ्यांची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी लागणारे अलोट परिश्रम व्ही. राघवन् करायला कचरले नाहीत. मात्र या प्रचंड प्रकल्पाची इ. स. १९८५ साल उजाडेपर्यंत १०–१२ खंडांपलीकडे मजल गेलेली नाही.

'न्यू कॅटलॉगस् कॅटलॉगरम्' हा विसाव्या शतकातील दीर्घ व अखंड परिश्रम करून बनविलेला एक न भूतो न भविष्यति असा संदर्भ-ग्रंथ आहे, याची दाद साऱ्याच संस्कृत विद्येच्या मूलगामी संशोधकांनी घेतली आहे, यात शंका नाही.

भारतीय हस्तलिखित ग्रंथांबद्दलची डॉ. व्ही. राघवन् यांची आस्था पाहून भारत सरकारने युरोपमध्ये संस्कृत हस्तलिखित पोथ्या कोठे कोठे आहेत व त्या किती असू शकतील याचा ठाव घेण्यासाठी त्यांना युरोपच्या दौऱ्यावर पाठविले. या दौऱ्यावरून परत आल्यावर त्यांनी एक 'Manuscripts, catalogues, editions : steps taken for the collection, preservation and utilization of manuscripts' 1963 या नावाची पुस्तिका तयार केली. या पुस्तिकेत केलेल्या महत्त्वाच्या सूचना इ. स. १९८५ साल उजाडले तरी भारत सरकारच्या दप्तरी 'may be filed' या एका हुकुमान्वये रुजू झाल्या आहेत. युरोपनंतर त्यांनी अमेरिकेत दौरा केला. या दौऱ्यात पेन्सिल्व्हानिया, हार्वर्ड, शिकागो, कॅलिफोर्निया आदी विद्यापीठांना त्यांनी भेट दिली. तेथील प्रा. नॉर्मन् ब्राऊन्, प्रा. इन्गेल्स्, प्रा. मिल्टनसिंगर, व्हॉन बुटेमान् आदी नामवंतांची भेट घेऊन तेथील संस्कृत हस्तलिखित पोथ्यांचाच नव्हे तर इतर भारतीय विद्याशाखांचा कोणकोणत्या विद्यापीठांत अभ्यास चालतो याचाही त्यांनी शोध-बोध घेतला. गौहत्ती विद्यापीठाने प्रा. काकती मेमोरियल लेक्चर सिरीज् मार्फत 'Sanskrit and allied Indian studies in U. S. A.' या नावाने त्यांची व्याख्याने इ. स. १९७५ साली प्रकाशित केली आहेत. हस्तलिखित पोथ्यांचा सांभाळ कसा करावा यासंबंधी त्यांनी परंपरागत आलेला एक श्लोक उद्धृत केला आहे तो येथे दिल्यास अनाठायी होऊ नये :

'संभूहयं सदपत्यवत् परकरात् संरक्ष्यं च सुक्षेत्रवत् ।
संशोध्यं व्रणिताङ्गवत्, प्रतिदिनं वीक्ष्यं च सन्मित्रवत् ॥
बध्यं वध्यवदश्लथं दृढगुणैः, स्मर्यं हरेर्नामवत् ।
नैवं सीदति पुस्तकं खलु कदाप्येतद्गुरूणां वचः ॥

भारतात पोथ्या किती आहेत ?

भारतात, युरोपात व अमेरिकेत, तिबेट, पाकिस्तान, श्रीलंका, जावा, सुमात्रा आदी ठिकाणी संग्रहालयांतून आणि व्यक्तिशः संगृहीत अशा पोथ्या आहेत तरी किती ? २१ व्या (कॉंप्युटरच्या) शतकात त्यांचा नेमका आकडा कॉंप्युटरच्या साहाय्याने सांगता येईल. मात्र आजच्या घटकेस तो अंदाजे सांगता येईल. केवळ एका सम्पूर्णानंद संस्कृत युनिव्हर्सिटीमध्ये (पूर्वीचे सरस्वतीभवन ग्रन्थागार) वाराणसी येथील ग्रंथसंग्रहात एक लाख दहा हजारांवर ताडपत्रांवरील, भूर्जपत्रांवरील, हातमाग कागदांवरील, कातड्यांवरील हस्तलिखितांच्या पोथ्या

आहेत. या ग्रंथांची विवरणात्मक सूची डॉ. सुभद्र झा यांनी बारा खंडांतून प्रकाशित केली आहे. कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीमध्ये हरप्रसादशास्त्री, राजेन्द्रलाल मित्र आदी अभ्यासकांनी गोळा करून संग्रह केलेल्या पोथ्यांचीही विवरणात्मक सूची प्रसिद्ध झाली आहे. तंजावर येथील महाराजा सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालयात जमा असलेल्या संस्कृत, प्राकृत, तेलगू, तामिळ, मराठी, कन्नड आदी भाषांतील पोथ्यांचा असाच कॅटलॉग २० खंडांतून प्रसिद्ध झाला आहे. बिकानेर येथील अनूप संस्कृत पुस्तकालयातील पोथ्यांची सूचीही डॉ. कुन्हन् राजा व माधव कृष्ण शर्मा यांनी सात खंडांतून प्रसिद्ध केली आहे, आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतात व इतरत्र विखुरलेल्या हस्तलिखितांचा शोध करून संगृहीत केलेल्या ग्रंथांच्या ४००–५०० सूची प्रसिद्ध झाल्या आहेत (पहा, न्यू कॅ. कॅ. प्रस्तावना). या सर्वांची संख्या सहज दहा लाखांच्या वर जावी असा प्राच्यविद्यामंदिर, बडोदा या संस्थेचे भूर्तपूर्व संचालक डॉ. संडेसरा यांनी आपल्या प्राच्यविद्या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणातून अंदाज वर्तविला होता. याविषयी विदग्ध पंडितांमध्ये चर्चा होत असते.

सामान्य लोकांना हस्तलिखितांची बाडे घरी असणे ही अडगळ वाटते. ती एक राष्ट्रीय संपदा आहे, राष्ट्रातील बुद्धिमंतांच्या विचारविभवाची अक्षरनिबद्ध संरचना आहे, याची फिकीर सामान्य माणसांना नसते. पण अशा या वैभवाची नोंद राष्ट्रातील सुबुद्ध कार्यकर्त्यांनी घ्यावयाची असते. गेल्या शंभर वर्षांत भारत सरकारच्या सुबुद्ध अधिकाऱ्यांनी अधून मधून त्याची दखल घेतली आहे. इ. स. १८६८ मध्ये व्हीटले स्टॉक याने फर्मान काढून हस्तलिखितांचा संग्रह करण्याच्या कामाला गती दिली. तशी इ. स. १९६० सालीही नॅशनल आर्काइव्हज्चे भूतपूर्व संचालक डॉ. भार्गव यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्याने या हस्तलिखितांच्या बाबतीत दिशा दाखविण्यासाठी एक समिती नेमली होती. तिचे पुढे काय झाले ते ऐकिवात नाही.

परंतु राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान (स्थापना १९७२) स्थापन झाल्यावर आता इ. स. १९८५ साली त्याची शाखा दिल्लीला निघाली असून, हस्तलिखित ग्रंथांची सूचीविषयक अद्ययावत माहिती त्या शाखेमार्फत गोळा केली जात आहे. त्यांतून काहीतरी उपयुक्त संदर्भ–साहित्य निघेल अशी अपेक्षा करू या !

हा पूर्वेतिहास सांगण्याचे मुख्य कारण असे की हे काम केवळ सरकारचे, म्हणजे केन्द्रसरकारचे वा राज्यसरकारचे नव्हे; तर येथील सुबुद्ध इतिहास-संशोधकांचेही आहे. केन्द्रसरकारप्रमाणे राज्यसरकारांनीही या कामी लक्ष घालायला हवे. यापूर्वी राज्यसरकारांनी आपापल्या राज्यांतून हस्तलिखिते गोळा करण्याचे काम स्वीकारले होते. संस्थानिकांनीही या कामी बहुमोल कामगिरी

केली होती. बडोदा नरेश गायकवाड, म्हैसूरचे नरेश, त्रिवेन्द्रमचे राजे आदी अनेक संस्थानिकांनी या कामी स्वयंप्रेरित चालना दिली होती. सध्याच्या लोकशाहीप्रधान राज्यांच्या सरकारांनी या कामी हालचाल करायला हवी. कारण भाषावार राज्यव्यवस्था अंमलात आल्यापासून निदान मध्ययुगात लिहिल्या गेलेल्या स्थानिक भाषांतील दुर्लभ हस्तलिखितांचे संग्रह पुढील पिढीला उपलब्ध झाले पाहिजेत. उदेपूर येथील साहित्य संस्थानने, एकत्रित केलेल्या अशा हिंदी–मारवाडी–राजस्थानी भाषांतील जुन्या हस्तलिखितांचा कॅटलॉग ५ खंडांतून प्रसिद्ध केला आहे.

मराठी, गुजराती कन्नड आदी भाषांतून ठिकठिकाणी विखुरलेल्या हस्तलिखितांतील ग्रंथांचीही, आल्फ्रेच्ने केलेल्या सूचीप्रमाणे एक बृहत्सूची तयार केली तर ती त्या त्या साहित्याच्या संपदेचा आविष्कार करावयास निश्चितपणे उपयुक्त होईल.

सर्वेक्षणे करावयास हवीत

लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ् इंडियातर्फे भारतातील भाषांचे सर्वेक्षण केले गेले त्याला आता पन्नास वर्षे उलटून गेली आहेत. भाषांचे सर्वेक्षण म्हणजे त्यांतील हस्तलिखितांचे सर्वेक्षण नव्हे. संस्कृत–पाली–प्राकृत प्रमाणे भारतातील चौदाही भाषांतील व त्यांच्या उपभाषांत लिहिल्या गेलेल्या व हस्तलिखित स्वरूपात दडून बसलेल्या या साहित्याचा सुगावा लागावयाचा असेल तर तशी जनतेकडून, इतिहास-संशोधकांकडून पद्धतशीर योजना आखून ती त्या त्या सरकारांकडे विचारार्थ पाठविली जाणे इष्ट आहे. ही गोष्ट सर्वांच्या नजरेसमोर यावी हा प्रमुख उद्देश या लेखामागे आहे. ही कल्पना योग्य वाटल्यास संशोधक ती उचलून धरतील व एकत्र बसून तशी योजना आखून राज्यसरकारांपुढे विचारार्थ मांडतील ही अपेक्षा !

■ ■

Summary

Survey of historical Indian manuscripts

The earliest available written ducument in india is of the year 350 B. C. and is in the form of a copper plate found at Sohgore. Indian mauscripts are available in different ancient, medieval and also dialect languages written in various scripts such as Sharda, Magadhi, Granth, Devnagari, Modi, Mahajan, Persian etc and are found to be written on various materials such as palm-leaf, paper, cloth, leather, stone,

bricks, copper, silver, tusk, etc. Efforts to collect together Indian manuscripts scattered at different places and prepare catalogues, indexes etc. for them are afoot ever since the last quarter of the 18th century. A survey of such efforts is made here and it is suggested that alongwith the Central government, the State governments and other public bodies should also come forward to participate in this vast work of national importance.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : १, जुलै १९८५

महाभारत : एक पुरातत्त्वीय दृष्टिकोन*

गौरी लाड
डेक्कन कॉलेज, पुणे

पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये डॉ. ह. धी. सांकलिया यांच्या मार्गदर्शनाखाली महाभारताचा पुरातत्त्वीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची संधी प्रस्तुत लेखिकेला काही काळापूर्वी मिळाली. या अभ्यासातून जे निष्कर्ष निघाले ते पीएच्. डी. च्या प्रबंधरूपाने सादर करण्यात आलेले आहेत. तेच सदरहू लेखात थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हे निष्कर्ष, आजवरच्या महाभारताच्या संशोधनाची जी दिशा आहे, त्याहून फार भिन्न आहेत असे नव्हे. महाभारताची उत्क्रांती चंद्रकलेप्रमाणे टप्प्याटप्प्यांनी झाली व त्यात वेळोवेळी भर घालण्यात आली, ह्या आजवर अनेक विद्वानांनी मांडलेल्या सिद्धांताचीच येथे पुनरुक्ती करण्यात येत आहे. फरक एवढाच की ह्या सिद्धांताप्रत पोहोचण्यास या लेखात काही वेगळे निकष लावण्यात आले आहेत. हे पुरातत्त्वीय निकष आज आहेत त्या प्रमाणात पूर्वी कधीही उपलब्ध नव्हते. त्यामुळे प्राचीन ग्रंथांची पार्श्वभूमी उलगडून पाहण्यासाठी त्यांचा पूर्वी फारसा उपयोगही कधी करण्यात आला नव्हता.

हे निकष महाभारताला लावून पाहण्याचे प्रयोजन काय ? तर महाभारत हा आपणा सर्वांचा एक अमोल सांस्कृतिक ठेवा आहे. " A rich mine of culture " ह्या शब्दांत अनेक पाश्चात्त्य विद्वानांनी त्याचा गौरव केला आहे. त्यात जितके खोलवर जावे तितके काहीतरी नवेनवेच हाताशी लागते. त्यामुळे त्याचे ऐतिहासिकत्व पडताळून पाहण्याचा मोह एखाद्या इतिहासकारास टाळता आला तरच नवल !

विवाद्य ऐतिहासिकत्व

महाभारताची मूळ कथा आहे भाऊबंदकीची. मात्र तिच्या अवती-भोवती

* श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर चाळिसाव्या स्मृतिदिनानिमित्त भा. इ. सं. मंडळात दिलेले व्याख्यान, दि. २८ व २९ नोव्हेंबर, १९८३.

आख्यायिकांचे आणि दंतकथांचे एक प्रचंड जाळेच विणले गेले आहे. जवळ-जवळ लाखावर श्लोकांचे अगडबंब शरीर धारण केलेला हा ग्रंथ आहे. हा एवढा मोठा उपद्व्याप कुणा एका व्यक्तीच्या आवाक्याबाहेरचा होता. खुद्द महाभारतातच व्यासांची शिष्यपरंपरा सांगितलेली आहे.[१] व्यासांनी आपले 'भारत' सुमन्तु जैमिनी, पैल, शुक आणि वैशंपायन ह्या आपल्या पाच शिष्यांस सांगितले. पैकी वैशंपायनाने आपली आवृत्ती जनमेजयाच्या म्हणजे अर्जुनाच्या नातवाच्या सर्पयज्ञ सोहळ्याच्या प्रसंगी गाऊन दाखविली. तेथे ती सौती ह्याने ऐकली व पुढे शौनकांच्या आग्रहास्तव नैमिषारण्यातील ऋषिमुनींसमोर पुन्हा एकवार सविस्तर कथन केली. वैशंपायनाचे भारत फक्त २४०० श्लोकांचे आणि उपाख्याना रहित होते असे आदिपर्व म्हणते.[२] सौतीने मात्र सर्व उपाख्यानांसह विस्तृत असे महाभारत कथन केले. म्हणजेच व्यासांची एक, वैशंपायनाची दुसरी व सौतीची तिसरी अशा तीन आवृत्त्यांची स्मृती खुद्द महाभारतातच जोपासलेली आहे. सौतीचे कथानक वाढवून शौनकाने रचलेली चौथी, मग पाचवी, सहावी, सातवी अशा महाभारताच्या अनेक आवृत्त्या प्रसृत होत गेल्या. होता होता आजचे आपले अजस्र महाभारत निर्माण झाले. ही झाली वैशंपायनाच्या आवृत्तीची कहाणी. पण व्यासांच्या इतर चार शिष्यांच्या आवृत्त्यांचे काय झाले कोणास ठाऊक ! कदाचित त्यांच्या अशाच अनेक आवृत्त्या निर्माण झाल्या असतील व शेवटी सर्वांचे मिळून एक महाभारत झाले असेल. हे कधी, कसे व का झाले ह्याची जाणीव मात्र बुजून गेली असावी. शतकानुशतके चाललेल्या ह्या प्रक्रियेचा उगम व अंत दोन्ही काळाच्या उदरात गडप झाले. म्हणूनच ह्या प्रचंडकाय निर्मितीस भारतीय परंपरेने अनंतत्व बहाल करून टाकले.

पण अखेर ही प्रचंड व्याप्ती आणि हा शिथिल कालानुक्रमच महाभारतास नडला; त्याच्या ऐतिहासिक महत्त्वास बाधक ठरला. महाभारतातले काय ग्राह्य मानावयाचे आणि काय सोडून द्यावयाचे, ग्राह्य मानलेला पुरावा नक्की कोणत्या कालाशी जोडावयाचा, असे अनेक यक्षप्रश्न महाभारताच्या अंतरंगात शिरू पाहणाऱ्या इतिहासकारांस भेडसावू लागले. त्यामुळे आधुनिक इतिहासकारांच्या दृष्टीने एक ठाम अशी जन्मतिथी नसलेल्या ह्या ग्रन्थाचे ऐतिहासिक प्रामाण्य विवाद्य ठरले; किंबहुना ते बहुतांशी निरर्थकच झाले.

एक नवा प्रयोग

ह्यातून मार्ग काढावयाचा तर महाभारताच्या उत्तरोत्तर होत गेलेल्या वाढीचा वेध घेत त्याचा एक संलग्न सांधा तयार करणे अगत्याचे होते. या दिशेने पहिले पाऊल उचलले ते पुण्यातील भांडारकर इन्स्टिटयूटच्या संशोधित आवृत्तीने. देशाच्या आणि देशाबाहेरच्या कानाकोपऱ्यातून गोळा केलेली हस्तलिखिते श्लोकास

श्लोक आणि शब्दास शब्द अशी पडताळून ही आवृत्ती तयार करण्यात आली.

त्यापुढचे पाऊल म्हणून एक नवा प्रयोग करावयाचा होता. महाभारताला एका नव्या पुराव्यावर पडताळून पाहावयाचे होते. स्वातंत्र्योत्तर गेल्या ३०–३५ वर्षांत भारतात अनेक ठिकाणी अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने झालेल्या उत्खननांतून एक अत्यंत बोलका पुरावा उपलब्ध झालेला आहे. उत्खननांत सापडलेल्या प्रत्येक वस्तूचा काळ आणि संदर्भ निश्चित असतात, हे ह्या पुराव्याचे आगळे वैशिष्टय. सोबत शिल्पांतील कोरीव दगडांची व प्राचीन नाणी व शिलालेखांची साक्ष आहेच. ह्या एकत्रित पुराव्याच्या समन्वयातून महाभारताला निश्चित स्थलकालाशी जोडणारा एकादा दुवा सांधता येतो का ते पहावयाचे होते. कालौघात निखळलेले असे अनेक दुवे सांधता सांधताच अगदी नकळत महाभारताच्या जडण–घडणीची प्रक्रिया उलगडत जाणे शक्य होते. असा हा एक नवा प्रयोग करून पहावयाचा होता. ह्या प्रयोगाचा भाग म्हणून केलेला हा एक लहानसा प्रयत्न.

ऐतिहासिक व पुरातत्त्वीय निकष लावून महाभारताच्या उत्क्रांतीचा मागोवा घेत असताना त्याचे काही निश्चित टप्पे आपल्यासमोर येतात.

पहिला टप्पा : प्रागैतिहासिक काळ

महाभारताच्या उत्क्रांतीचा पहिला टप्पा प्रागैतिहासिककाली, ख्रि. पू. ६०० हून अधिक वर्षांपूर्वी केव्हातरी गाठला गेला. हाती आलेला पुरावा सांगतो की महाभारताची पाळेमुळे अतिपुरातन प्रागैतिहासिक काळात कोठेतरी खोलवर रुजलेली आहेत. पण नक्की किती खोलवर हे मात्र आज सांगणे कठीण आहे. नंतरच्या काळात इतके काही नवे महाभारतात आले आणि जुन्या व नव्याचे इतके बेमालूम मिश्रण झाले की एकापासून दुसरे वेगळे करणे सद्यःपरिस्थितीत तरी अजिबात शक्य नाही. भारताच्या संदर्भात ऐतिहासिक कालाची सुरुवात साधारण-पणे ख्रि. पू. ६०० पासून गणली जाते. त्याआधीचे महाभारतात काही आहे का हा शोध घेत असताना हाती तसे विशेष काहीच लागत नाही. जे थोडेफार लागते तो एका प्रकारे नकारार्थी पुरावा आहे. महाभारतात काय आहे यापेक्षा त्यात काय नाही ह्याचा हा शोध आहे. महाभारत जर खरोखर अतिपुरातन असले तर काही गोष्टींचा त्यात अभाव हा असणारच. ह्या अभावाने जाणवणाऱ्या गोष्टी कोणत्या याचा आढावा घेतला असता महाभारताचे अतिप्राचीन रूप डोळ्यांसमोर साकार होऊ लागते.

साखर

महाभारताची एकंदर कथा राजपुत्रांभोवती रचलेली आहे. राजसभा आणि राजप्रासाद ह्यांच्या ऐश्वर्यात वावरणारी ही मंडळी. पण ह्यांचे रोजचे अन्न मात्र

साधे शिजलेले मांस आणि यवागु, दूध आणि दही. या अन्नात तिखट-मिठाचा संपूर्ण अभाव. रुचकर मसाले तर नाहीच नाहीत. गोडव्याला फक्त मध. साखरेचा कोठेच वापर नाही. मात्र हा वापर भारतात ख्रि. पू. ४०० वर्षांपूर्वीच सुरू झाल्याची साक्ष पाणिनी आपल्याला देईल. पाणिनीला ऊसच नाही तर उसाच्या रसापासून तयार होणारी काकवी (फणित), गूळ (गुडू) आणि साखर (शर्करा) देखील माहीत होती.[३] उसाची (इक्षूची) ओळख प्राचीन भारतीयांस अगदी अथर्व-वेदकालापासून होती.[४] पण गूळ व साखर तयार करण्यासाठी विपुल प्रमाणात उसाची लागवड असणे जरुरीचे असते. वेदकाली अशी लागवड होती असे जरी मानले तरी रस काढण्यासाठी लागणारे लाकडी चरक, रसाचे काकवी आणि गुळात रूपान्तर करण्यासाठी लागणाऱ्या मोठमोठाल्या लोखंडी कढया इत्यादी सामग्री गृहीत धरता येत नाही. साखर हे तर काकवी व गुळाच्याही पुढचे संस्कारित रूप. शुभ्र दाणेदार शर्करेच्या निर्मितीअगोदरचे टप्पे कौटिल्याने वर्णन केलेले आहेत.[५] प्रथम ओली काकवी अथवा फणित, मग चिकट गूळ, त्यानंतर माशाच्या अंड्या-सारखी दिसणारी खरबरीत दाण्याची पण चिकट मत्स्यण्डी, त्यापुढे मात्र सुकी आणि दाणेदार पण तांबूस रंगावरची खाण्ड आणि अगदी शेवटी पांढऱ्याशुभ्र दाण्याची शर्करा. बौद्धांच्या धर्मग्रन्थात–' विनयपीटका'न–गुळाच्या मोठमोठाल्या ढेपा आणि गुळाच्या व्यापाराचे उल्लेख आहेत.[६] महाभारतातले चित्र त्याहून फार वेगळे आहे. शर्करेचा तर उल्लेखच नाही, पण गूळ आणि फणितदेखील क्वचित कोठेतरी सापडते.[७] मध अथवा मधु हेच खरे तर त्यांचे मुख्य मधुर पक्वान्न !

रेशीम व शिवलेले कपडे

जी कथा रोजच्या अन्नाची, तीच रोजच्या वस्त्रांची. महाभारतातील राजपुत्रांची राहणी साधी होती. कंबरेखाली एक धोतरवजा अन्तरीय व खांद्यावर शालीसारखे पांघरावयाला एक उत्तरीय अशी दोनच सुती वस्त्रे ते वापरीत. कोणत्याही प्रकारची शिवलेली वस्त्रे–अंगरखे, चोळणे, पायजमे किंवा विविध प्रकारे सुंदर गाठी घालून बांधलेले कमरबंद इत्यादी वस्त्रे–अपवाद म्हणूनसुद्धा महाभारतात कोठे नाहीत. नाही म्हणावयाला कञ्चुकांचा तीनदा उल्लेख आहे. त्यांतील एक तर उपमावाचकच आहे.[८] दुसरे दोन आहेत कञ्चुकधारित अश्वस्वारांचे व द्वारपालांचे.[९] कञ्चुके हे बंदगळ्यांचे अंगरखे ख्रि. पू. पहिल्या शतकाच्या सुमारास मध्यपूर्व आशियातून आलेल्या शककुशाणांनी भारतात प्रचलित केले. गुडघ्यापर्यंत अंगरखा व खाली तंग विजार असा हा पोषाख घोडदळातील स्वारांना अत्यंत सोयीचा होता. शकादी जे परकीय आक्रमक त्या सुमारास भारतात आले ते पट्टीचे अश्वारोहक म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या प्राचीन साहित्यात ह्या वेषास उदीच्य वेष अथवा उत्तरेकडील पोषाख म्हणून संबोधिले जाते. ह्या पोषाखात वावरणाऱ्या

व्यक्ती प्रथमतः सांची येथील खिर. पू. १–२ ऱ्या शतकातील शिल्पांत आढळतात व त्या तेथे परकीय म्हणून गणल्या जातात.[१०] सांची व बारहूत येथील शिल्पांत धोतरांच्या वर बांधलेल्या कमरबंदाचे देखील अनेक सुरेख प्रकार दिसून येतात. बौद्धांच्या 'चूलवण' ह्या ग्रन्थातसुद्धा अशा आकर्षक वेषभूषांची वर्णने आहेत.[११] त्या मानाने महाभारतातील राजपुत्र जरा साधेसुधे आणि थोडे रांगडेच वाटतात.

काही विशेष प्रसंगी सुती वस्त्रांऐवजी तलम क्षौम वापरण्याचा प्रघात होता. कौरवांच्या सेनापतिपदाचा अभिषेक करून घेताना कर्ण क्षौम नेसून बसला होता.[१२] राजसूय यज्ञाचे यजमानपद भूषविताना युधिष्ठिर असाच क्षौम ल्यायला होता.[१३] स्वयंवराची माळ हातात घेऊन उभी असलेली द्रौपदीसुद्धा क्षौम नेसली होती.[१४] एवढेच नव्हे तर पितामह भीष्म आणि कौरव राजपुत्रांच्या शाही इतमामाने झालेल्या अंत्यविधीचे वेळी त्या सर्वांचे मृतदेह क्षौमात गुंडाळण्यात आले होते.[१५] अळशीच्या तंतूपासून विणलेले क्षौम रेशिमाइतके मृदु व चमकदार असे. मात्र अळशीची लागवड आणि तिच्यापासून तंतू उकलण्याची प्रक्रिया किचकट असल्यामुळे प्राचीन काळी क्षौमाचे उत्पादन बेताचेच असे. पुढे पुढे क्षौमाचे स्थान रेशमाने पटकाविले. परंतु महाभारतात मात्र राजेरजवाड्यांनी निवडक सोहोळ्यांचे प्रसंगी वापरावयाचे उंची तलम वस्त्र म्हणून क्षौमाचेच महत्त्व आहे. कौशेय अथवा रेशमाचा उल्लेख महाभारतात अजिबात नाही असे नाही. पण बहुतेक उल्लेख उपमावाचकच आहेत.[१६] कौशेयाचा चटकन नजरेत भरण्याजोगा वापर फक्त पीतकौशेयधारी कृष्णाच्या रूपाने दिसतो तेवढाच.[१७] महाभारतातले क्षौमाचे महत्त्व त्याचे वैदिक कालाशी साधर्म्य दाखविते. मात्र कौशेयाची ओळख वैदिक साहित्यास नाही. पाणिनीपासून, म्हणजे खिर. पू. ४०० पासून, त्याचे उल्लेख साहित्यात येऊ लागतात.

पाटलीपुत्र

महाभारतात जसा साखर व रेशीम यांचा उल्लेख नाही तसा पाटलीपुत्र नगरीचाही नाही. ही गैरहजेरी विशेषेकरून जाणवते ती अशा कारणाने की महाभारतांत हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातील अनेक स्थळांचे, जनपदांचे, नद्यापर्वतांचे व तीर्थस्थानांचे उल्लेख वा वर्णने आहेत. पाटलीपुत्राअगोदरची मगधदेशची प्रसिद्ध राजधानी गिरिव्रज शिशुपालाचे नगर म्हणून महाभारतास चांगलीच परिचित आहे.[१८] पण अनेक शतके भारतीय उपखंडाच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा केन्द्रबिंदू बनून राहिलेले पाटलीपुत्र मात्र महाभारतांत कोठेच नाही हे आश्चर्य नव्हे काय? बौद्धग्रन्थांच्या साक्षीनुसार पाटलीपुत्राचा पाया खिर. पू. ५ व्या शतकात घातला गेला. लिच्छवींचा बीमोड करण्यासाठी मगध–सम्राट अजातशत्रूने गंगेच्या तीरावरील पाटलिग्राम ह्या लहानशा गावी एक किल्ला बांधण्यास घेतला.

अजातशत्रूनंतर उदायीने तर आपले राजधानीचे शहरच राजगृहाहून पाटलिग्राम येथे हलविण्याचे ठरविले, व त्यातूनच पुढे पाटलीपुत्र हे प्रसिद्धी पावलेले वैभवशाली नगर उभे राहिले.[१९] जुन्या पाटलीपुत्राच्या परिसरात झालेल्या उत्खननातून तेथील नागरी जीवनाच्या आरंभाची हीच तिथी मिळते.[२०] सर्वात जुना स्तर ख्रि. पू. ६०० ते २०० ह्या काळातला आहे. मात्र ख्रि. पू. ६०० पूर्वी जेव्हा महाभारत नामक एका प्रचंड वटवृक्षाचे बीज नुकतेच रुजू लागले होते तेव्हा पाटलीपुत्र अस्तित्वातही नव्हते. त्यामुळेच की काय कोण जाणे, पण महाभारताला पाटलीपुत्राचे भान नाही.

काच

महाभारतात, मानवनिर्मित वस्तूंपैकी ज्यांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो तो म्हणजे कांच व कांचेच्या वस्तूंचा. ख्रि. पू. सातव्या–आठव्या शतकापासून कांचेची ओळख प्राचीन भारतीयांस होती. कठकसंहिता, शतपथ ब्राह्मण, तैत्तिरीय ब्राह्मण इत्यादि वैदिक ग्रन्थांत कांचेचे तुरळक उल्लेख आलेले आहेत.[२१] उत्खननातून देखील पुरातन कांचेचे नमुने उपलब्ध आहेत. कर्नाटकांत मस्की येथे ख्रि. पू. १००० वर्षांपूर्वीचे ४ ताम्रयुगीन कांचेचे मणी सांपडले आहेत.[२२] असेच काही मणी व फुटक्या बांगडयांचे तुकडे हास्तिनपूर येथील उत्खननातून ख्रि. पू. १०००–८०० वर्षांपूर्वीच्या स्तरांतून मिळाले आहेत.[२३] ह्याच परिसरातल्या आलमगीरपूर व श्रावस्ती ह्या दोन ठिकाणच्या समकालीन स्तरांतून कांचेचे आणखी काही नमुने मिळाले आहेत.[२४] परतु वैदिक ग्रन्थांप्रमाणे हा पुरातन उत्खनित पुरावादेखील तुरळकच आहे. एकाद दुसरा मणी व दोन–चार बांगडयांचे तुकडे ह्यापलीकडे कांचेचे फारसे काहीच सापडत नाही. मौर्यकालापासून मात्र काचेच्या उत्पादनास जोर चढला व परिणामी मौर्यकालीन स्तरांत कांचेच्या वस्तूंचे प्रमाण अगदी अचानक खूप वर गेल्याचे दिसून येते. तक्षशिलेच्या अवशेषांत हे प्रामुख्याने जाणवते.[२५] मौर्यकालीं कांचेच्या उत्पादनाची तक्षशिला, अहिच्छत्र, कौंडिन्यपूर, कौशांबी, राजघाट, श्रावस्ती, उज्जैन अशी अनेक केन्द्रे होती.[२६] ह्या सर्व केन्द्रांतून कांचेच्या विविध वस्तू बाहेर पडत. मणी, बांगडया, फुलांच्या आकाराची गळयातील लंबके, कर्णफुले तसेच लहान-मोठे शिक्के इत्यादि वस्तू मौर्यकालीन उत्खननातून मुबलक प्रमाणात मिळतात. ह्या सुमारास संमिश्र कांचे (Composite glass) च्या उत्पादनाची कलादेखील हस्तगत करण्यात आली.[२७] परिणामी कांच ही एक रोजच्या वापरातील वस्तू होऊन बसली. महाभारतात मात्र काचेचा मागमूस नाही. अर्थातच महाभारताच्या संशोधित आवृत्तीत ! संशोधित आवृत्तीतून बरेच काही वगळले गेले आहे. त्यांत कांचमण्याचा एक उल्लेखही आहे. द्रोणपर्वात भीमाने ध्रुवाला बुकलून ठार केल्याची कथा आहे.[२८] ह्या घटनेसंबंधी तामिळ ग्रन्थ–आवृत्तीत थोडा

आणखी तपशील आलेला आहे. एकादा कांचमणी मुठीने ठेचावा तसे भीमाने धरुवाला ठेचले असे वर्णन आहे. पण इतर आवृत्त्यांतून ह्या वर्णनास पुष्टि न मिळाल्याने संशोधित आवृत्तीने नेमक्या ह्याच ओळी गाळून टाकल्या आणि त्याबरोबर महाभारतात आलेला हा कांचेचा एकमेव उल्लेख देखील गळून गेला.

चलनी नाणी

गैरहजेरीचा आणखीन एक किस्सा सांगण्यासारखा आहे. सोन्याचे दागदागिने ल्यायलेले राजबिंडे वीर सर्वत्र वावरत असूनसुद्धा महाभारतातील व्यवहार चलनी नाण्याशिवाय चालतात. वस्तूंची देवाण-घेवाण व अदलाबदल (barter) हेच सर्व आर्थिक व्यवहारांचे स्वरूप आहे. वेदांतले निष्क हे सोन्याचे प्रमाण महाभारतातही आढळते. पण निष्कास नाण्याची संज्ञा देणे जरा कठीण. खऱ्या अर्थाने ते नाणे असे नव्हतेच. निष्क देऊन अथवा निष्काच्या माध्यमातून एकाद्या वस्तूची खरेदी-विक्री वा देवाण-घेवाण झाल्याचे एकही उदाहरण महाभारतात नाही. केलेल्या सेवेदाखल राजीखुषीचा मोबदला म्हणून राजेरजवाडे आपल्या सेवेकऱ्यांस व विशेषेकरून ब्राह्मण उपाध्यायांस वेळोवेळी निष्काचे दान करीत. कोणत्याही महत्त्वाच्या कार्यास आरंभ करण्यापूर्वी स्वस्तिवाचन करणाऱ्या उपाध्यायास किंवा यज्ञविधि पार पाडणाऱ्या पुरोहितास मुठीने निष्क देण्याचा प्रघात होता.[२९] निष्काचे प्रलोभन दाखवून कीचकाने द्रौपदीचे[३०] व दुष्यन्ताने शकुंतलेचे[३१] मन जिंकण्याचा प्रयत्न केल्याचेही उल्लेख महाभारतात आहेत. बहुतेक वेळा निष्काचा उपयोग गळ्यात घालावयाचा एक दागिना म्हणूनच होत असे. दोऱ्यात ओवलेली गळ्याभोवती घालावयाची सोन्याची छोटी गोल " पुतळी " असा निष्काचा उल्लेख वेदांत काय किंवा महाभारतात काय अनेकदा आढळतो.[३२] ह्याउलट पाणिनी एका सुसूत्र अशा नाणे पद्धतीचे वर्णन करतो.[३३] सोन्याची निष्क, सुवर्ण, हिरण्य व मषक, चांदीची शतमान, शण, कर्षापण व माष, आणि तांब्याची विंशटीक व त्रिंशटीक अशी नाणी आणि वजनांची प्रमाणे अष्टाध्यायीत आहेत. पाणिनीच्याही पूर्वीची खि. पू. ५–६ व्या शतकातली चांदीची नाणी देखील आज उपलब्ध आहेत. " बेन्ट-बार्स " (Bent bars) ह्या नावाने ओळखली जाणारी ही नाणी सर्वप्रथम तक्षशिलेतील भीड टेकडीच्या उत्खननातून बाहेर आली. पण त्यांचा प्रसार तक्षशिला व गांधार देशांपुरताच मर्यादित होता. ह्या नाण्यांचा आकार किंचित बाकवलेल्या चांदीच्या लगडीसारखा होता. म्हणून त्याना " बेन्ट–बार्स " हे नाव देण्यात आले. पुढे लवकरच भारतीय उपखंडातून, विशेषतः गंगायमुनेच्या खोऱ्यातून चांदीची आहत (Punch marked) नाणी मिळू लागली.[३४] गोलाकार किंवा चौकोनी पण किंचित जाडसर व ओबडधोबड अशा ह्या नाण्यांच्या दोन्ही बाजूंस निरनिराळे ठसे उमटविण्यात आले होते. हे ठसे नाणी पाडणाऱ्या व वेळोवेळी

हाताळणाऱ्या व्यापारी संघाचे असावेत असा बहुतेक विद्वानांचा कयास आहे. ही नाणी पुरातत्त्वीय पुराव्यानुसार एन. बी. पी. (Northern Black Polished Ware) काल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ख्रि. पू. ५००–२०० वर्षांपूर्वीच्या स्तरातली आहेत. ह्या दोन तीनशे वर्षांचे काळांत अनेक शहरांची वाढ झाली व व्यापारउदिमास भरभराटीचे दिवस आले. ज्यायोगे नाण्यांचेही महत्त्व वाढले. ह्या पार्श्वभूमीवर महाभारतात नाण्यांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो व तदनुसार महाभारताचा काल ख्रि. पू. ४–५ व्या शतकाच्याही मागे सरतो.

लिखित पुरावा

ह्याप्रमाणे महाभारतात ख्रि. पू. ५००–६०० वर्षे पुरातन ज्या ज्या गोष्टी नाहीत त्यांचा आढावा घेतला असता महाभारताचा उगम ख्रि. पू. ५००–६०० वर्षांहून अधिक पूर्वी झाला हे निश्चित. पण नक्की किती पूर्वी हे मात्र एक न उकललेले कोडे आहे. येथे काही प्राचीन ग्रंथ आपल्या मदतीस येतात. ख्रि. पू. ८०० वर्षांहून पुरातन गणल्या जाणाऱ्या वैदिक ग्रंथांत – चार वेद, ब्राह्मणे व उपनिषदे – महाभारतकथेचा मागमूसही नाही. यज्ञभूमी म्हणून कुरुक्षेत्र विख्यात आहे, पण कुरुक्षेत्री घडलेल्या कोणत्याही लढाईचा उल्लेख वरील ग्रंथांत नाही. कुरू व पांचाल ह्या दोन महाभारतकालीन जनपदांचे महत्त्व वेदकालांतही होते, पण महाभारत युद्धाला मात्र अजून जनमानसात स्थान प्राप्त झाले नव्हते.

ख्रि. पू. ७००–८०० वर्षांपूर्वीची ही परिस्थिती. परंतु ख्रि. पू. ४००–५०० च्या सुमारास मात्र ' भारत ' अथवा ' महाभारत ' नावाचे एक ऐतिहासिक काव्य उदयास येऊन सर्वपरिचित झाल्याचे संदर्भ सांपडतात. ' भारत ' अथवा ' महाभारत ' नावाच्या ग्रंथाचा अगदी प्रथम उल्लेख आश्वलायन गृह्यसूत्र व शाङ्खायन श्रौतसूत्र ह्या दोन सूत्रग्रंथांत आढळतो.[३५] ह्या सुमारास पाणिनीच्या अष्टाध्यायीत देखील महाभारताचा उल्लेख येतो.[३६] अष्टाध्यायीचा व सूत्रग्रन्थांचा काल ख्रि. पू. ४०० हून नंतरचा मानला जात नाही, म्हणजेच ख्रि. पू. ८००–४०० ह्या ४ शतकांच्या कालात केव्हांतरी महाभारताचे गठन झाले असावे. कोण्या एका युद्धाची प्रेरणादायी स्मृती ह्या ४०० वर्षांच्या कालावधीत एका ओजस्वी राष्ट्रीय काव्यात परिणत झाली. ही ४०० वर्षे उत्तरभारताच्या इतिहासात मोठ्या स्थित्यंतराची होती. महत्त्वाकांक्षी राजसत्तेच्या लालसेपुढे लहानसहान राज्यांचे व गणसत्तांचे बळी पडत होते. ह्या अटीतटीच्या चुरशीतून पुढे मगधचे शक्तिशाली साम्राज्य उभे राहिले. महाभारत युद्धकथेची ही पार्श्वभूमी आहे. आज जवळजवळ २००० वर्षांनंतर ह्या पुरातन महाभारताचे स्वरूप काय होते हे सांगणे दुरापास्त आहे. कदाचित वीरश्रीने ओथंबलेल्या आख्यानांचा ग्रंथनिर्मितीच्या काठावर तरंगणारा एक अगदी शिथिल संच एवढेच त्या पहिल्यावहिल्या महाभारताचे स्वरूप असेल.

महाभारताच्या गठनाची प्रक्रिया येथे येऊन थांबली असेही नाही. ती तशीच पुढे कित्येक शतके अव्याहतपणे चालू होती. महाभारत युद्धाचा आणि कौरव व पांडव ह्या चुलत भावंडांच्या वैराचा खरा ठाम उल्लेख ख्रि. पू. २–३ ऱ्या शतकांत कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत येतो. [३७]तेव्हा कोठे आपणास महाभारतकथेच्या अंतरंगाचा सुगावा लागतो. तोपर्यंतचे महाभारत केवळ नावानेच तेवढे ज्ञात होते. बहुधा व्यासांनी ह्या प्रक्रियेस सर्वप्रथम चालना दिली. त्यानंतर वैशंपायनाने व्यासांचे मूळ कथानक थोडे वाढवून दुसरी आवृत्ती प्रसृत केली. ह्या आवृत्तीस सौतीने उपाख्याने जोडून भारताचे महाभारतात रूपांतर केले. कौटिल्यास आणि पतञ्जलीस [३८] बहुधा हे महाभारत अभिप्रेत असावे. ह्या जवळजवळ ८००–१००० वर्षे सातत्याने चाललेल्या प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा ख्रि. पू. ४००–५०० च्या सुमारास गाठला गेला. इतस्ततः विखुरलेली शेकडो आख्याने एका अद्वितीय अशा सलग कथारूपाने एकत्रित आली आणि त्यांस 'महाभारत' ही संज्ञा प्राप्त झाली.

उत्क्रांतीचा दुसरा टप्पा : ख्रि. पू. ५००–१०० वर्षे

ख्रि. पू. ५ व्या शतकापासून महाभारताच्या उत्क्रांतीच्या अत्यंत महत्त्वाच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात होते. बौद्ध पाली ग्रंथांशी समकालीन अशी ही प्रक्रिया होती. ह्याचमुळे कदाचित ह्या दोहोंत एक अत्यंत निकटचे साधर्म्य आहे. हा कौटुंबिक वारसा प्रामुख्याने आढळून येतो, तो रोजच्या घरगुती वापराच्या तसेच मौल्यवान चैनीच्या वस्तूंत.

चंदन

ह्या कालची नजरेत भरण्याजोगी प्राप्ती म्हणजे चंदन व अगरू ह्या दोन सुगंधी लाकडांची. वैदिक साहित्यास चंदनाची ओळखसुद्धा नाही. पाणिनीचीही तीच कथा. ह्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. कारण की, चंदन एका टोकास दक्षिणेत तर अगरू दुसऱ्या टोकास ईशान्येस उगवत असे व अजूनही उगवते. दूर दक्षिण व ईशान्य प्रांतांबरोबर सांस्कृतिक व व्यापारी संबंध प्रस्थापित झाल्याखेरीज चंदन व अगरूची ओळख प्राचीन संस्कृत साहित्यास होणे शक्य नव्हते. ही सुगंधी द्रव्ये मौल्यवान असल्यामुळे त्यांच्या खरेदी–विक्रीसाठी समृद्ध बाजारपेठाही असणे आवश्यक होते. ह्या दोन गोष्टी मौर्यकाली घडून आल्या. मौर्यांच्या भक्कम, शक्तिशाली साम्राज्याने जवळ–जवळ संबंध भरतखंड एका राजकीय आधिपत्याखाली आणला. जेणेकरून देशांतर्गत भरभराटीचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले, दक्षिणेतून चंदन व ईशान्येकडून अगरू मगध व त्या लगतच्या उत्तरी प्रांतांत अवतीर्ण होऊ लागले. पाटलीपुत्र येथील मौर्यांच्या खजिन्यात मोठी किंमत चुकवून या किंमती लाकडांचे भारेच्या भारे भरून ठेवण्यात

येऊ लागले व त्यांच्या मागणीला एकदम जोर चढला. दूरवरून येणाऱ्या त्या सुगंधी लाकडांसाठी आता उत्तरेत एक समृद्ध बाजारपेठ निर्माण झाली. कौटिल्य १६ प्रकारच्या चंदनांचे व ३ प्रकारच्या अगरु लाकडांचे वर्णन करतो.[३८अ] अशा प्रकारे खरे म्हटले तर ख्रि. पू. २–३ ऱ्या शतकापासून चंदनाच्या व्यापारास जोर चढला. महाभारतातील काय किंवा पाली साहित्यातील काय, चंदनाचे उल्लेख ह्याच सुमारचे असावेत. ह्याअगोदरचे असणे जरा असंभवनीय आहे.

महाभारतात चंदनाचे उल्लेख अनेक आहेत. महाभारतातले राजपुत्र चंदनाचे पट्टे ओढून आपले शरीर सुशोभित करीत असत. स्नानानंतर शरीरावर चंदनाचा लेप करण्याची देखील त्यांना हौस होती. पुष्कळदा स्नानाच्या पाण्यातच चंदनाचे मिश्रण केले जाई.[३९] चंदनाचा हा असा मुक्तहस्ताने वापर मौर्यकालीन त्याच्या व्यापाराने जोर धरल्यानंतरच शक्य होता. पुराव्यादाखल बौद्धांच्या विनयपीटकातला एक संदर्भ देणे योग्य होईल.[४०] राजगृहाच्या एका धनाढ्य व्यापाऱ्याने– एका सेठीने– एका बौद्ध भिक्षूस देण्याकरिता एक चंदनाचे भिक्षापात्र तयार करवून घेतले. ही साधीसुधी भेट नव्हती तर विशेष मौल्यवान होती. कारण हे पात्र घडविताना चंदनी लाकडाचे जे कपचे उडाले ते ह्या श्रीमंत सेठीने स्वत:साठी जपून गोळा करून घेतले. बौद्ध साहित्यातले सेठी ऐश्वर्यांत त्यावेळच्या बलशाली राजांपेक्षा कांकणभर जास्तच असत. पण चंदन मुळी इतके दुर्मिळ आणि महाग होते की त्यांनादेखील त्याचा वापर जपून करावा लागे. भरभराटलेल्या व्यापाराने मात्र ही परिस्थिती बदलली. दैनंदिन जीवनातले एक सुगंधी लेपन म्हणून चंदनाचा वापर समाजातल्या समृद्ध स्तरांत रूढ झाला.

रत्ने

महाभारतात आलेली रत्ने व जडजवाहिरे, हिरवीगार वैदूर्ये, तांबडीभडक पोवळी व शुभ्र मोत्यें ही देखील दक्षिण भारत व सिंहलद्वीपांतून येत. वैदूर्ये व मोत्यें सिंहलद्वीपातून आल्याचे उल्लेख खुद्द महाभारतातच आहेत.[४१] याव्यतिरिक्त अगदी अलीकडेपर्यंत निलगिरी पर्वताच्या परिसरातील सध्याच्या तामिळनाड प्रांतात वैदूर्यमण्याच्या खाणी होत्या. पोवळी मलबार किनारपट्टीच्या समुद्रातून आजही मिळतात, तर मोत्यें भारत व लंकेच्या मधल्या मन्नारच्या खाडीतून येतात. ह्या समुद्रपट्टीतून पोवळी व मोत्ये काढण्याचा उद्योग फार प्राचीन कालापासून अस्तित्वात होता. कर्नाटकातील मस्की व महाराष्ट्रातील तापी खोऱ्यातील प्रकाशे ह्या दोन ठिकाणच्या ताम्रयुगीन अवशेषांत काही पोवळ्यांचे मणी सापडले आहेत.[४२] पण नर्मदेपलीकडे उत्तरेत मात्र ऐतिहासिक कालाअगोदर असे मणी सापडल्याचा उत्खननात किंवा साहित्यात कोठेच दाखला नाही. दक्षिणेस जसजसे संबंध घनिष्ट होऊ लागले तसतशी ही रत्ने उत्तरेतील प्रमुख बाजारपेठांच्या

शहरी दिसू लागली. विदुर अथवा सध्याचे विदर येथून वैदूर्यमण्यांची आयात झाल्याचे पाणिनी सांगतो.[४३] मौर्य साम्राज्याच्या स्थापनेनंतर दक्षिण व लंकेशी सांस्कृतिक व व्यापारी संबंध अधिकच दृढ झाले आणि दक्षिणेकडील रत्नांना उत्तरेत जोराची मागणी आली. तक्षशिला येथील भीड टेकडीच्या उत्खननातून मौर्यकालीन वैदूर्यमणी सापडले आहेत.[४४] ह्या मण्यांची संख्या फारच तुरळक असली तरी त्यांची साक्ष महत्त्वपूर्ण आहे. कारण ह्याअगोदरच्या काळातील असा एकही मणी उत्तरेत कोठे उपलब्ध नाही. महाभारतात व इतरत्र प्राचीन साहित्यात ह्या रत्नांचे जे उल्लेख येतात ते मौर्यकालाच्या फारसे पूर्वीचे असणे संभवनीय नाही. आणि म्हणूनच वैदिक साहित्यास त्यांची ओळखदेखील नाही.

आयुधे

एक युद्धकथा ह्या नात्याने महाभारतात आलेल्या शस्त्रास्त्रांची व आयुधांची संख्या फार मोठी आहे. जवळ जवळ ३०–४० प्रकारचे बाण, ११ प्रकारचे भाले व इतर अनेक प्रकारची आयुधे भारतीय युद्धाची रंगत वाढवितात. ह्यातील फार थोडी शस्त्रे अशी आहेत की ज्यांच्या नावांवरून त्यांच्या आकाराचे व प्रमाणाचे अनुमान करता येते. मात्र ह्या बहुतेक शस्त्रास्त्रांची नावे कौटिल्याने अर्थशास्त्रांत शस्त्रास्त्रांच्या खुलासेवार केलेल्या वर्णनात येतात. नाराच, क्षुरप्र, वत्सदंत, भल्लू वगैरे बाण; शक्ति. तोमर, प्रास, कणय इत्यादी भाल्यांचे प्रकार; तलवारींच्या हस्तिदंती मुठी; पट्टिश, शतघ्नी, दंड, हूड वगैरे, जडवजनी लाकडी खांब व लोखंडी कांबी; विविध प्रकारची यंत्रे ही जशी महाभारतांत आहेत तशी ती अर्थशास्त्रातही आहेत.[४५] ह्याचाच अर्थ असा की सध्या उपलब्ध असलेल्या महाभारताच्या आवृत्तीत वर्णन केलेले भारतीय युद्ध कौटिल्यकालीन शस्त्रास्त्रांनी लढले गेले असले पाहिजे. महाभारताच्या दृष्टीने ही सगळ्यात मोठी शोकांतिका आहे. कां की मूळ भारतीय युद्धाचे चित्र आता पुनश्च उभे करणे जवळजवळ अशक्यप्राय आहे. मूळ युद्ध होते तरी कसे ? आर्य टोळ्यांतर्गत एक छोटीशी लढाई की भावंडाभावंडांतील एक कौटुंबिक झगडा की केवळ एका वैयक्तिक सूडाचा प्रवास ? आज कितीही कठोर कसोट्या लावल्या तरी हे मूळ युद्ध पुनश्च साकार होणे नाही. नंतरच्या ऐतिहासिक काळात महाभारतातील युद्धसाहित्यांत इतकी भर पडली की मूळ भारतीय युद्धाचा चेहरामोहरा पार बदलून गेला.

लोखंड

योगायोग असा की महाभारताच्या उत्क्रांतीचा हा दुसरा टप्पा पुरातत्त्वीय पुराव्यानुसार 'एन. बी. पी.' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कालाशी समांतर आहे. ख्रि. पू. ५००–२०० वर्षांपूर्वीच्या उत्तर हिंदुस्थानातील अनेक प्रमुख

शहरांच्या उत्खननात काळ्या रंगाची चकचकीत व धातूसारखी खणखणीत आवाज करणारी मातीच्या भांड्यांची खापरे सापडली आणि त्यावरून ह्या कालास ' एन. बी. पी. ' (Northern Black Polished Ware) अथवा उत्तरी काळ्या चकाकीच्या भांड्यांची संस्कृती असे नाव पडले. ह्या कालचे प्रमुख वैशिष्टय म्हणजे लोखंडाचा व लोखंडी हत्यारे व अवजारे ह्यांचा सुरू झालेला वापर. लोखंडाचा तुरळक वापर भारतात ख्रि. पू. १००० वर्षांपासून होत आलेला आहे. पण लोखंडी हत्यारांचा ह्यात फारसा समावेश नव्हता. कौशांबीच्या पहिल्या स्तरातून (ख्रि. पू. १०२५–९५५) लोखंडाचे लहान-सहान तुकडे मिळाले आहेत. मात्र दुसऱ्या स्तरातून (ख्रि. पू. ८५५–६०६) लोखंडी हत्यारे दिसू लागतात.[४६] उत्तरेतील इतर शहरांच्या उत्खननातूनसुद्धा–आणि त्यात हस्तिनापूरचे उत्खनन देखील येते– ह्याच सुमारास लोखंडी अवजारे मिळू लागतात. ह्यात अगदी हाताच्या बोटावर मोजण्याजोगे काही बाण व भाले आहेत. मात्र ख्रि. पू. ६०० पासून लोखंडी हत्यारांचा वापर सार्वत्रिक झाला. बाण व भाले ह्यांच्या संख्येत खूप मोठी वाढ झाली. तक्षशिला, कौशांबी व उज्जयिनी ह्या तीन महत्त्वाच्या शहरांच्या उत्खननात हे ठळकपणे दिसते. कौशांबी येथे ११ प्रकारचे बाण सापडले आहेत. पैकी पहिले ८ प्रकार ख्रि. पू. ६०५–४५ ह्या एन. बी. पी. कालीन स्तरांतून येतात. यांतले पहिले चार प्रकार सर्वांत जास्त प्रचलित होते असे दिसते. कौशांबीतील सुस्थितीत असलेल्या लोखंडी बाणांची संख्या जवळ जवळ ३५० च्या वर, तर भाल्यांची संख्या ५० चे वर आहे. मोडक्या व तुटक्या हत्यारांचा ह्यात समावेश नाही.[४७] लोखंडाने प्राचीन जीवनात जी आमूलाग्र क्रांती घडवून आणली तिचेच ही हत्यारे प्रतीक आहेत. लोखंड घडविण्यास कठीण, पण इतर कोणत्याही धातूपेक्षा जास्त टणक व मुबलक प्रमाणात उपलब्ध असते. त्याच्या वापराचा प्रारंभ हा अनेक नव्या अवजारांच्या व हत्यारांच्या वापराचा प्रारंभ असतो. साहजिकच एन. बी. पी. कालात लोखंडाच्या सार्वत्रिक वापराने उद्योगधंद्यांत व विशेषेकरून युद्धसाहित्यात व युद्धतंत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणले.

एकत्रित पुरावा

ह्या सर्व एकत्रित पुराव्याची साक्ष भरभक्कम आहे. महाभारताचे मूळ स्वरूप काही का असेना व कितीही पुरातन का असेना, त्याची खरी वाढ ऐतिहासिक काळात, ख्रि. पू. ५००–२०० ह्या काळात झाली. ह्या काळच्या घटनांचा व उलाढालींचा ठसा महाभारतावर कायमचा उमटला गेला आहे, व परिणामी महाभारताला त्याचे आजचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

महाभारतावर कायमचा ठसा उमटविणाऱ्या ह्या कालाची पार्श्वभूमी तरी काय होती ?

ऐतिहासिक काल (ख्रि. पू. ५००-२००) : पार्श्वभूमी

ख्रि. पू. ६–७ व्या शतकापासून भारतात नवी राजकीय परिस्थिती निर्माण होऊ लागली होती. आर्यांचे टोळ्यांतर्गत जीवन ढासळू लागले होते व त्याजागी लहान–मोठी राज्ये उभी राहू लागली होती. पण विजिगीषु सम्राटांच्या महत्त्वाकांक्षेपुढे ही राज्येदेखील एकेक करून कोसळू लागली. साम्राज्यबांधणीच्या ह्या प्रक्रियेने पूर्वेकडील प्रांती विशेष जोर धरला व ख्रि. पू. ६ व्या शतकात मगधाचे साम्राज्य उभे ठाकले. ह्या साम्राज्याने पुढे २–३ शतकांनी येणाऱ्या मौर्यांच्या विशाल शक्तिशाली साम्राज्याची वाट मोकळी करून दिली. मध्यंतरीच्या काळात मात्र जसे साम्राज्याचे वेध लागले तसे राजकीय व सैनिकी शक्तींचे ध्रुवीकरण सुरू झाले. लहानमोठी राज्ये, गणराज्ये, प्रजासत्ताके ह्यांची आपसात सतत चुरस सुरू झाली, सतत संघर्ष होत राहिले. भारतीय युद्धदेखील अशाच एका संघर्षाच्या ठिणगीतून निर्माण झाले असणे शक्य आहे. एव्हांपर्यंत लोखंडाचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला होता व त्यायोगे युद्धसाहित्य व तंत्र ह्यांत फार मोठी क्रांति घडून आली होती.

मौर्यांच्या उदयाबरोबर मात्र ही परिस्थिती निवळली. एक नवे पर्व सुरू झाले. सबंध भारतीय उपखंड प्रथमतःच एका अत्यंत स्थिर अशा मध्यवर्ती सत्तेच्या आधिपत्याखाली आला. त्यायोगे सांस्कृतिक देवाणघेवाण व व्यापारी संबंधांस उधाण आले. राजमार्गांस अभय मिळाले; नव्या बाजारपेठा उदयास आल्या; लांबवरच्या वस्तूंस मागणी वाढली; मागणीबरोबर पुरवठ्याचे नवनवे मार्ग चोखाळले गेले; जुन्या शिल्पांस भरभराटीचे दिवस आले व नव्या कलांस लोकाश्रय मिळाला. अशा प्रकारे सर्व बाजूंनी एका समृद्ध जीवनाचा पाया घातला गेला, पण त्याचबरोबर एका प्रचंड सैनिकी शक्तीचा देखील उदय झाला. मध्यवर्ती सैनिकी तुकड्या लांबवरच्या प्रांतीय राजधान्यांच्या शहरी ठेवण्यात येऊ लागल्या. शस्त्रे व आयुधें यांच्या प्रमाणात व वापरात मोठी वाढ झाली. युद्धाचे कसब वाढले व निरनिराळ्या प्रकारची शस्त्रात्रे निर्माण झाली.

महाभारतासारख्या जिवंत साहित्यिक प्रवाहांत ह्या सर्व घटनांचे प्रतिबिंब न उमटले तरच आश्चर्य.

ह्या काळातल्या संस्कृत साहित्याचा आढावा घेतला असता तिच्यात एकच प्रकारची दिशा दिसून येते. सूत्रग्रंथ काय किंवा पाणिनीचे व्याकरण काय, कौटिल्याचे अर्थशास्त्र काय किंवा बौद्धांचे त्रिपीटक काय, सर्वांचा प्रयत्न सारखा सुसूत्रता आणण्याकडे होता. त्या त्या विषयाची उपलब्ध सर्व माहिती गोळा करून तिचे पृथक्करण करणे, तिच्यावरून काटेकोर बंदिस्त साचा तयार करणे ह्याकडेच जास्त कल होता. संस्कृत साहित्याचे सोनेरी पर्व अजून पुढे दोन–तीन शतकांनी

उगवायचे होते. तोपर्यंत संपादन, संकलन, पृथक्करण हाच साहित्यातला प्रमुख प्रवाह होता. ह्या काळात महाभारतालासुद्धा ह्याच प्रवाहातून पार व्हावे लागले असल्यास नवल नाही. मुनिवर्य व्यास व त्यांच्या शिष्योत्तमांनी आपली प्रतिभा पणास लावून, विखुरलेली शेकडो, हजारो आख्याने एकत्र संपादित केली, सलग कथारूपाने ती गोवून टाकली आणि त्यांची पर्ववार वाटणी करून त्यांचा एक साचा तयार केला. कदाचित असा पहिला प्रयत्न अगदी प्रागैतिहासिक काळात झाला असेल व त्यावरोवर व्यासांचे नाव महाभारताशी कायमचे जोडले गेले असेल. मात्र संकलन आणि संपादनाचे पुढचे टप्पे ऐतिहासिक काळांत झाले हे महाभारताच्या आजच्या स्वरूपावरून सहज स्पष्ट होते, किंबहुना ती ह्या काळातील साहित्याची प्रमुख ओळख आहे.

उत्क्रांतीचा तिसरा टप्पा [इ. १००–४००]

महाभारताच्या उत्क्रांतीचा पुढचा म्हणजे तिसरा टप्पा इसवीच्या १००–४०० वर्षे ह्या चार शतकांच्या काळात गाठला गेला.

एव्हाना महाभारताच्या कथानकाचे स्वरूप बहुतांशी साचेबंद झाल्यासारखे होते. परिणामी यापुढील शतकांत जे काही नवे महाभारतात आले ते अगदी अलगदपणे उचलून बाजूला काढता येते. ही नवी भर प्रामुख्याने राजेरजवाडयांनी उपभोगावयाच्या मौल्यवान वस्तूंची होती. ह्यांतील कित्येक वस्तू तर दूरवरच्या बाहेरील देशांतून आयात करण्यात येत असत.

ही ३–४ शतके सांस्कृतिक दृष्टया अत्यंत महत्त्वाची होती. ग्रीक, शक; हूण, कुषाण इत्यादि परकीय आक्रमकांचे आगमन व त्याबरोबर रोम व चीन ह्या साता समुद्रांपलीकडील देशांशी व्यापारी दळणवळण अशा दुहेरी कारणांनी अनेक नव्या वस्तूंची ओळख ह्या सुमारास भारतीय साहित्यास झाली.

चिनी रेशीम

चिनी रेशीम हे याचे एक उत्तम उदाहरण. हे रेशीम खुष्कीच्या मार्गाने भारतात येत असे. हा रेश्मी मार्ग (Silk–routs) थेट चीनच्या सीमेपासून भूमध्य समुद्रकिनाऱ्यावरल्या टायर ह्या शहरापर्यंत जाऊन भिडत असे. तेथून पुढे जलमार्गाने हे रेशीम रोमला नेण्यात येत असे. ख्रि. पू. पहिल्या शतकापासून हा महामार्ग खुला झाला होता. रोम व युरोपात जसजशी चिनी रेशमास मागणी वाढू लागली, तसतसे ह्या मार्गावरचे व्यापारी दळणवळणही वाढू लागले. ह्या मार्गाचा मधला टप्पा तिबेट, मध्य आशिया व इराणमधून जात असे. ह्या सबंध भूभागात एकीकडे भटक्या हिंस्र टोळयांचा वावर होता, तर दुसरीकडे पार्थियन साम्राज्य पसरले होते. साहजिकच ह्या अतिशय किफायतशीर व्यापाराचे मध्यस्थ हीच मंडळी होती. चिनी रेशीम विकून वारेमाप फायदा उकळणाऱ्या पार्थियन

साम्राज्याशी जेव्हा रोमने युद्ध पुकारले तेव्हा त्यामागील महत्त्वाचा हेतू, ह्या व्यापारावर आपली पकड बसविणे हा होता. पण पार्थो–रोमन युद्धाचा निकाल लागेपर्यंत मात्र हा सबंध व्यापार हिंदुस्थानमार्गे वळविण्यात आला. अफगाणिस्थानातील बाह्स्क येथून आत वळून तक्षशिला व उज्जैनमार्गे हे रेशीम भडोच येथे आणण्यात येई. तेथून जलमार्गाने ते अरबी समुद्रातून अलेक्झांड्रिया व पुढे रोमला पोहोचते करण्यात येई. भारतीय साहित्यात चीनांशुकाचे उल्लेख ह्याच काळात, म्हणजे इसवीच्या पहिल्या शतकांत येऊ लागतात. महाभारतातला चिनी रेशमाचा एकमेव उल्लेख देखील ह्याच सुमारास त्यात शिरकावण्यात आला हे त्याच्या संदर्भावरून स्पष्ट होते. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञप्रसंगी भेटीदाखल आलेल्या मौल्यवान वस्तूंत कीटज व पट्टज अशा दोन प्रकारच्या रेशमांचा समावेश होता. ही रेशमे शक, हूण, चीन इत्यादि मध्य आशियात मुक्तपणे संचार करणाऱ्या टोळ्यांनी बाह्लीचीन येथून आणली असे सभापर्व म्हणते.[४८] प्राचीन बाह्लीचीन म्हणजे आजचा सोव्हिएट रशियातील तुर्कमेनिया म्हणून ओळखला जाणारा प्रदेश होय. रेशमी मार्गावरला हा एक महत्त्वाचा टप्पा होता. सभापर्वाच्या ह्या दोन अध्यायांत–अध्याय ४७ व ४८– 'रोमा' अथवा रोम व भरुकच्छ अथवा भडोच ह्यांचाही उल्लेख आहे. त्यावरून ही प्रकरणे नंतरच्या काळांत, इसवीच्या पहिल्या–दुसऱ्या शतकांत महाभारतात गोवण्यात आली ह्या मतास जास्तच पुष्टी मिळते. महाभारतात इतरत्र कोठेही चिनी रेशमाचा संदर्भ नाही हे विशेष. इसवीच्या १–२ ऱ्या शतकानंतर महाभारत कथानकात वाटेल तशी ढवळाढवळ करणे सोपे राहिले नव्हते. ह्याचेच हे प्रत्यंतर. राजसूयाच्या भव्य सोहळ्याचे निमित्त करून जे थोडेफार नवे आत घुसडता आले ते ह्या दोन अध्यायांनी सामावून घेतले. पण असे फेरफार सर्व ठिकाणी करणे जास्त जास्त कठीण होऊ लागले होते.

परदेशी अजिने

परदेशातून आयात केलेल्या चिनी रेशमाबरोबर ऊबदार, मऊ, केसाळ व गहिऱ्या रंगाची अजिनेदेखील येत. इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकात ह्या सुरेख कमावलेल्या व आकर्षक पद्धतीने रंगविलेल्या मध्य आशियातील अजिनांना जगभर खूप मागणी होती. 'सेरिक स्किन्स' (Seric skins) म्हणून ओळखली जाणारी ही सुंदर चामडी सिंधूच्या तोंडालगतच्या बारबेरिकम ह्या बंदरातून रोम व युरोपला रवाना होत असत असे रोमन इतिहासकार प्लिनीने व त्या काळच्या 'पेरिप्लुस ऑफ दि एरिथ्रिअन सी' या ग्रीक ग्रंथात नमूद करून ठेवले आहे.[४९] मध्य आशियातून येणारे शक व कुषाण घोडेस्वार ह्या कमाविलेल्या चामड्यांचे अंगरखे, तंग विजारी व गुडघ्यापर्यंत येणारे उंच बूट घालीत. युरोप व आशियाभर तुफानी

घोडदौड करीत त्यानी हा आपला पोषाख जगभर प्रचलित केला. शक, हूण, चीन वगैरे परकीय टोळ्यांमार्फत कार्पासिक, कांबोल, उत्तरकुरू, वाह्लीचीन ह्या भारताच्या वायव्य सरहद्दीलगतच्या टापूतून ही अजिने येत असल्याचे उल्लेख महाभारतातसुद्धा येतात. ह्यातले बहुतेक उल्लेख तर सभापर्वाच्या त्याच ४७ व्या अध्यायात येतात, ज्यात चिनी रेशमाचाही उल्लेख आहे.[५०] सभापर्वाचे हे दोन अध्याय त्यामुळे अगदी सहजपणे बाजूला काढता येतात. त्याना असे सुटे करून त्यांचाच वेगळा अभ्यास केला असता (आणि असा एक पांडित्यपूर्ण अभ्यास डॉ. मोतीचंद्र यानी केलेला आहे)[५१] असे दिसून येते की कुणा कवीने अथवा कवींनी अगदी प्रयत्नपूर्वक हे अध्याय रचून युधिष्ठिराच्या राजसूययज्ञाच्या वर्णनास जोडून दिलेले आहेत. युधिष्ठिराला आलेल्या भेटवस्तूंची जंत्री तयार केली तर इसवीच्या पहिल्या दोनतीन शतकांत भरभराटलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फार परिणामकारक चित्र डोळ्यापुढे उभे राहते.

अजिनांचा आणि मृगचर्मांचा वापर भारतातील अरण्यवासी ऋषि-मुनि फार पुरातन कालापासून करीत. ही अजिने आपल्या जंगलांतून वावरणाऱ्या हरिणांची व काळविटांची असत. मात्र ती केसाळ नसल्याने थंड प्रदेशातून येणाऱ्या अजिनांइतकी मऊ व ऊबदार नसत. किंवा उत्तम कमावलेलीही नसत. तसेच त्यात सुरेख रंग भरण्याची प्रथाही नव्हती. वनवास स्वीकारणारे तेवढे त्यांचा सोयीसाठी उपयोग करीत. क्षत्रिय राजपुत्र मात्र एकमेकांना भेटीदाखल परदेशी अजिनांचा नजराणा करीत. कौरवांना युद्धापासून परावृत्त करण्यासाठी आलेल्या कृष्णाला धृतराष्ट्राने मोठ्या सन्मानाने मौल्यवान चीनदेशीय अजिने भेट दिल्याचा संदर्भ उद्योगपर्वात आलेला आहे.[५२] सभापर्वात, इंद्रप्रस्थी राज्याधिष्ठित होणाऱ्या युधिष्ठिरावर तर ह्या किंमती अजिनांचा नुसता वर्षावच झाला.[५३] ह्यातली काही आज अफगाणिस्थानात मोडणाऱ्या कार्पासिक व कांबोज ह्या प्रदेशांतून, तर काही तिबेटलगतच्या उत्तरकुरु भागातून आणण्यात आली होती. ह्याहूनही पलीकडच्या वाह्लीचीन प्रांतातून तर केसाळ प्राण्यांच्या खाली (furs) आणण्यात आल्या होत्या. महाभारतात इतरत्र फारसे स्थान न मिळवू शकलेले हे सारे तपशील सभापर्वाच्या ह्या दोन अध्यायांत दाटीवाटीने एकत्र आलेले दिसतात.

रत्नजडित वस्तू

महाभारतातील राजपुत्र सोन्याच्या वस्तूंबरोबर रत्नजडित वस्तूंचा देखील वापर करीत अशा भ्रमात कोणी राहू नये. महाभारतात रत्नजडित वस्तूंचे उल्लेख फार थोडे, अगदी हाताच्या बोटावर मोजण्याजोगे आहेत. सरासरी ४०–५० पेक्षा जास्त उदाहरणे देता येणार नाहीत. सोन्याच्या वस्तू पुष्कळ आहेत, पण ह्यातील एखादीच रत्नांनी मढविलेली दिसेल. धनुष्य काय किंवा तलवार काय, जवळजवळ

प्रत्येकाकडे असे. अगदी साध्या सैनिकांपासून ते रथातील राजवीरांपर्यंत. परंतु ह्यातील एखादेच धनुष्य किंवा एखाद्याच तलवारीची मूठ रत्नांनी सुशोभित केलेली असे. एखादे-दुसरे अंगद अथवा कुंडल, चारदोन रथ, एखादा ध्वज, क्वचित्प्रसंगी काही भांडी एवढेच काय ते ह्या रत्नजडित वस्तूंचे प्रमाण. ह्या मौल्यवान वस्तू काही थोडक्या लोकांची मिरासदारी असल्याचे हे प्रतीक असू शकेल. पण त्याहीपेक्षा, ह्या वस्तू नंतरच्या काळातल्या असल्यामुळे अल्पप्रमाणातच महाभारतात स्थान मिळवू शकल्या हे जास्त संभवनीय.

धातूवर रत्ने जडविण्याची कला भारतात आली ती शक-कुषाणांच्या पाउलांवर पाऊल ठेवून, इसवीच्या पहिल्या शतकात. तक्षशिलेच्या उत्खननात, शक-कुषाण कालच्या स्तरात (इसवीचे १–२ रे शतक), सर्वप्रथम अशा रत्नजडित वस्तू सापडतात. शकादि संलग्न जमातीतील लोकांना अशा वस्तूंचे फार आकर्षण होते. मध्य आशियात (सध्या हा सर्व प्रदेश सोव्हिएत रशियात मोडतो) अनेक ठिकाणी सिथियन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या थडग्यांतून दागदागिने, भांडीकुंडी, शस्त्रास्त्रे इत्यादी विविध प्रकारच्या रत्नजडित वस्तू सापडल्या आहेत. लेनिनग्राडचे जगप्रसिद्ध हर्मिटाज वस्तूसंग्रहालय ह्या रत्नजडित वस्तूंनी खच्चून भरलेले आहे. शकादी जमातींच्या भारतातील आगमनाबरोबर येथेही ह्या कलेस चालना मिळाली, किंबहुना उत्तेजन व राजाश्रय मिळाला.

हस्तिदंती आसने

महाभारत युद्धानंतर युधिष्ठिर हस्तिनापूरच्या गादीवर आरूढ झाला. दोन हातांना भीम व अर्जुन चवऱ्या ढाळीत आहेत व समोर दोन रत्नजडित हस्तिदंती मंचांवर एका बाजूला कुंती व एका बाजूला नकुल व सहदेव बसले आहेत असे शांतिपर्वात वर्णन आहे.[५४] हस्तिदंती आसनांचा महाभारतातला हा एकमेव उल्लेख आहे. ह्याला पर्यायी असे उल्लेख इतरत्र साहित्यांत इसवीच्या पहिल्या शतकापासूनच दृष्टीस पडतात. बौद्धांच्या 'महावस्तु' ह्या ग्रंथात हस्तिदंती आसनांचे, पर्यंकांचे व मंचांचे उल्लेख येतात.[५५] सुदैवाने ह्या काळातले, इसवीच्या १–२ ऱ्या शतकातले काही खरेखुरे नमुनेही आज उपलब्ध आहेत. तक्षशिलेच्या उत्खननात शक–कुषाण स्तरांतून छोटीशी हस्तिदंती कपाटे, टेबले आणि पलंग सापडले आहेत.[५६] ही बहुधा बाहुल्यांच्या खेळातील असावीत. पण अशा प्रकारचे मोठाले नमुने वापरात असण्याचा संभव पूर्णतया नाकारता येणार नाही. मात्र हस्तिदंताचा एवढ्या मोठ्या प्रमाणात वापर फक्त राजेरजवाड्यांनाच शक्य होता. कपिशा (अफगाणिस्थानातील बेग्राम) ह्या (कुषाणकालीन) महत्त्वाच्या शहरी हस्तिदंती कलाकुसरीचे सर्वोत्तम नमुने गणले जाणारे काही अतिशय सुंदर कोरीव तक्ते मिळाले आहेत.[५७] आज सुटे पडलेले हे तक्ते पूर्वी एखाद्या मंचाला वा सिंहासनाला

भूषवीत होते. एकंदरीत इसवीची पहिली दोन–तीन शतके हस्तिदंती कलेच्या दृष्टीने अतिशय भरभराटीची होती. देशांत तसेच देशाबाहेर, विशेषतः रोमन साम्राज्यांतर्गत प्रदेशात भारतीय हस्तिदंती वस्तूंना मोठी मागणी होती. इटली येथील पाँपीच्या उत्खननातून भारतीय बनावटीची एक अतिशय सुबक हस्तिदंती स्त्री–प्रतिमा आढळून आली. अशीच दुसरी महाराष्ट्रातील तेर (प्राचीन तगर) येथेही मिळाली आहे.[५८] ह्या हस्तिदंती वस्तू पश्चिम किनाऱ्यावरील भडोच ह्या बंदरातून समुद्रमार्गे रोम व आसपासच्या प्रदेशात पोहोचत्या करण्यात येत असत.

हस्तिदंती वस्तू घडविण्याची कला मात्र भारतात नवी नव्हती. अगदी थेट सिंधु संस्कृतीपासून ते इसवीच्या आरंभापर्यंत हस्तिदंताच्या अनेकविध वस्तू निरनिराळ्या उत्खननांतून बाहेर आलेल्या आहेत. तशा त्या महाभारतातही आहेत, बौद्ध पाली ग्रंथांतही आहेत. परंतु ह्यातील बहुतेक वस्तू रोजच्या वापरांतल्या लहान–सहान वस्तू आहेत. डोळ्यांत काजळ घालण्यासाठी लागणाऱ्या सुबक शलाका, केसांत खोवण्याच्या लहान फण्या व आकडे, द्यूतांतले चौकोनी फांसे, कर्णफुले, गळ्यांतील लंबके, छोटाले करंडे, आरसे–तलवारी इत्यादींच्या मुठी अशा गोष्टींचा ह्यात समावेश आहे. मात्र आसने, मंच अशा मोठाल्या वस्तू साहित्यात वा साहित्याबाहेर इसवीच्या पहिल्या शतकाअगोदर कोठेच दिसून येत नाहीत. अशा मौल्यवान वस्तू वापरण्याची क्षमता इसवीच्या सुरुवातीच्या भरभराटलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराने निर्माण केली. महाभारतातील हस्तिदंती मंच तर रत्नांनी मढविलेले होते. त्यावरून त्यांची तिथी जास्तच निश्चित होते. हा संदर्भ देखील शांतिपर्वातला आहे. शांतिपर्व हे महाभारताचे बारावे पर्व. युद्धाची सांगता झाली, पांडवांचा जय झाला, युधिष्ठिर हस्तिनापूरचा राजा झाला आणि शांतिपर्वाची सुरुवात झाली. राजधर्माचे आणि मोक्षधर्माचे धडे घेत ह्या शांतिपर्वातून युधिष्ठिराला राज्यशकट हाकावयाचा होता. असे हे महाभारताच्या मूळ युद्धकथेपासून बाजूला पडलेले व बहुतेक विद्वानांच्या मते महाभारतास मागून जोडले गेलेले शांतिपर्व. ह्यात काय आहे, म्हणण्यापेक्षा काय नाही हेच सांगणे जास्त कठीण. हस्तिदंती आसनांचा शांतिपर्वातला उल्लेख त्यामुळे अधिकच बोलका झाला आहे. नंतरच्या काळात महाभारतात वाटेल तेथे आणि वाटेल तेवढी भर घालणे शक्य नव्हते असेच हे एकुलते एक उदाहरण सांगते. नाहीपेक्षा एखाद्या अत्युत्साही कवीने महाभारतातील सर्वच्या सर्व राजसभा पांढऱ्याशुभ्र हस्तिदंती आसनांनी झगमगवून टाकल्या असत्या.

सिंहासन

हस्तिदंती आसने तर बाजूलाच राहोत, पण महाभारतातल्या राजसभांत

सिंहासने देखील आढळत नाहीत. सिंहाच्या आकाराचे पाय व सिंहाची तोंडे असलेले हात, अशा प्रकारे घडविलेल्या उंच खुर्चीस सिंहासन हे नाव देण्यात आलेले आहे. सार्वभौम राजसत्तेचा सिंह हा प्रतीक म्हणून हे सिंहासन फक्त अभिषिक्त राजानेच हक्काने वापरावयाचे असा प्राचीन संकेत होता. पण राजेशाही इतमामाने इंद्रप्रस्थाच्या किंवा हस्तिनापूरच्या गादीवर आरूढ होणारा युधिष्ठिर सिंहासनारूढ झाल्याचे संदर्भ नाहीत. सर्वसाधारणपणे महाभारतातील राजसभांतून दिसणारे आसन म्हणजे सोन्याचे, क्वचितप्रसंगी रत्नांनी मढविलेले गोलाकार पीठ. कधी कधी पाय ठेवण्यास समोर दुसरे एक छोटेसे पादपीठ असे. सर्व लहानथोर रजवाडे मंडळी ह्या पीठांचाच उपयोग करीत. सिंहासनाचे फक्त दोन उल्लेख महाभारतात येतात. दोन्हीही आदिपर्वातले आहेत व दोहोंचाही महाभारतातल्या प्रमुख पात्रांशी वा प्रसंगांशी काहीही संबंध नाही. पहिला उल्लेख यादवसभेतला आहे. अर्जुनाने सुभद्रेला पळवून नेल्यावर पुढील उपाययोजना करण्यासाठी यादववीरांची सभा बोलविण्यात आली. शस्त्रास्त्रांनी सुशोभित होऊन सभेला येणारा प्रत्येक यादववीर आपापल्या रत्नजडित सोनेरी सिंहासनावर आरूढ झाला असे वर्णन आहे.[५९] हा उल्लेख किती पोरकटपणाचा आहे हे सांगावयास नकोच. इथे सार्वभौम असा कोणी राजाच नाही. प्रत्येक यादववीराला सिंहासनाचा मान आहे. बहुधा यादवसभेचे वर्णन करण्याच्या प्रयत्नात अतिशयोक्तीचे भान कवीला राहिले नसावे. दुसरा उल्लेख तर आपल्याला थेट कैलास पर्वताच्या शिखरावर नेऊन पोचवितो. हिमाच्छादित कैलासावर थाटाने सिंहासनारूढ होऊन बसलेल्या भगवान शिवाचे हे वर्णन आहे.[६०] ही दोन वर्णने सोडली तर महाभारतात इतरत्र कोठेही सिंहासनाचा नामोल्लेखही नाही. आणि त्याला तशी सबळ कारणेही आहेत. सिंहासनाचा भारतातला पहिला नमुना इसवीच्या पहिल्या शतकात आढळून येतो. त्याअगोदर नाही. मथुरेतील एका शिल्पात कुषाण सम्राट विमा काडफायसिसचा एक सिंहासनारूढ पुतळा सापडला आहे. गुडघ्यापर्यंत उंच बूट, तंग विजार, बंद अगरखा. अशा पेहेरावातला हा कुषाण राजा हातातील तलवारीचे टोक जमिनीत रोवून थाटांत ऐसपैस सिंहासनावर बसलेला आढळेल.[६१] सिंहासनाचे पाय सिंहाच्या पंजाच्या आकाराचे आहेत तर हाताशी आ वासलेली सिंहाची तोंडे आहेत. ह्यानंतरचे नमुने नागार्जुनकोंडा[६२] व अमरावती[६३] येथील इसवीच्या २–३ ऱ्या शतकातील शिल्पांत आढळतात व पुढे अजिंठा येथेही दिसतात.[६४] सिंहासनाची मूळ संकल्पना इराणमधील. तेथून ती शकादि भटक्या टोळ्यांनी आपल्या आक्रमक पद्धतीने जगभर पसरविली. राजाचे राजत्व आणि सिंहाचे सिंहत्व ह्या दोहोंचा मेळ भारतातही प्राचीन काळापासून घालण्यात आला होता. त्यामुळे ही संकल्पना भारतात सहज रुजली. ह्याचे एक मूर्त स्वरूप म्हणजे मौर्य सम्राट अशोकाच्या सिंहारूढ स्तंभाचे. आपल्या प्रजासत्ताकाच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून आज

हा स्तंभ आपल्या सर्वांस परिचित आहे. पण ह्या मागची बलशाली साम्राज्याची प्रेरणादेखील अखमेनियन इराणचीच होती असे अनेक विद्वानांचे मत आहे.

इसवीच्या सुरुवातीची शतके : पार्श्वभूमी

ह्या सर्व वस्तूंची महाभारतास नव्याने ओळख झाली, त्यामागे एक निश्चित पार्श्वभूमी होती.

इसवीची पहिली दोन-तीन शतके भारताच्या दृष्टीने अतिशय उलथा-पालथीची ठरली. ग्रीक, शक, कुषाण इत्यादी परकीयांच्या आक्रमणांनी सारे समाजजीवन ढवळून निघाले. इसवीच्या पहिल्या शतकातच ग्रीक राजा मेनॉन्डर (बौद्ध परंपरेतला मिलिन्द) थेट पाटलीपुत्रापर्यंत येऊन थडकला होता, तर शक पार माळवा आणि सौराष्ट्रापर्यंत जाऊन ठेपले होते. शकांपाठोपाठ आलेल्या कुषाणांनी तर उत्तरेत एक प्रचंड साम्राज्यच उभे केले. कनिष्कांच्या साम्राज्याच्या सीमा भारतीय उपखंडाची सीमा ओलांडून एकीकडे मध्य आशियातील खोरासान-पर्यंत तर दुसरीकडे तिबेटपर्यंत जाऊन भिडल्या होत्या. भारताच्या राजकीय वा सांस्कृतिक प्रवाहाशी तोपर्यंत कधीही एकरूप न झालेले हे दूरवरचे दुर्गम प्रदेश प्रथमच भारताशी जोडले गेले. एका अर्थी ही एका नव्या युगाची नांदी होती. अनेक नवे सांस्कृतिक, राजकीय व व्यापारी संबंध ह्या काळात जोडण्यात आले. भारतातील नवोन्मुख राज्यकर्त्यांचे नाते इराण व मध्य आशियाशी असल्यामुळे ह्या प्रदेशांशी भारताची जोरात देवाणघेवाण सुरू झाली, आणि नकळत भारत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या भोवऱ्यात ओढला गेला. आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील इसवीचे पहिले शतक एक महत्त्वाचा क्षण घेऊन आले होते. चीनमधले विशाल हान साम्राज्य, भारतात कुषाणांची सार्वभौम सत्ता, इराण व मध्य आशियात समर्थ पर्शियन राजसत्तेचा उदय व त्यापलीकडे रोमचे वैभवशाली साम्राज्य अशा साखळीने युरोप व आशिया ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत बांधले गेले होते. सांस्कृतिक संबंध व व्यापारी दळणवळणासाठी न भूतो न भविष्यति अशी ही राजकीय पार्श्वभूमी होती. साहजिकच आंतरराष्ट्रीय व्यापारास उधाण आले. चीन ते रोम हा रेशमी मार्ग खुला झाला. रेशमाबरोबर अनेकविध वस्तूंची ने आण सुरू झालेली. तर ह्याच सुमारास मोसमी वाऱ्यांचाही शोध लागला व अरबी समुद्रातले जलमार्ग खुले झाले. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांना भरभराटीचे दिवस आले. भडोचपासून खाली मलबारपर्यंत अनेक बंदरे उदयास आली. भारतीय मालास परदेशात, विशेषतः रोमन साम्राज्यांतर्गत प्रदेशात जोराची मागणी आली. पूर्वेकडे चीन व पश्चिमेकडे रोम ह्या दोहोमधल्या व्यापा-रात भारत मध्यस्थाची भूमिका बजावू लागला. नफ्याचे माप भारताच्या बाजूने झुकते राहिले. परिणामी भारतातील राज्यकर्ते व व्यापारी वर्गाच्या हातात नव्याने

खेळणाऱ्या ह्या संपत्तीला अनेकविध वाटा फुटू लागल्या. दूरवरून आयात केलेल्या चैनीच्या किमती वस्तूंना जोराची मागणी आली व त्यांची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली. एका नव्या समृद्ध आणि विलासी नागरी जीवनाचा पाया रोवला गेला. महाभारताला देखील ह्या विलासी जीवनाचा थोडा स्पर्श झालेला आहे, पण फक्त स्पर्शच ! महाभारत कथेची चौकट एव्हांना घट्ट ठोकून चिरेबंदी झाली होती. तिच्या अंतरंगाला हात घालण्याचे सामर्थ्य ह्या स्पर्शात नव्हते.

ह्या दोन–तीन शतकांत संस्कृत साहित्याने देखील एक नवी उंची गाठली. भासाच्या नाटकांचा आणि अश्वघोषाच्या महाकाव्यांचा हा काळ. संस्कृत साहित्याच्या सुवर्णयुगाची ही सुरुवात होती. भासाच्या अनेक नाटकांची कथानके तर महाभारतातूनच उचललेली आहेत. ह्या काळात बौद्धदेखील संस्कृतकडेच वळले. अशा ह्या साहित्यिक सर्जनशीलतेच्या काळात महाभारतावर पुनः एकवार हात फिरविला गेला असल्यास नवल नाही.

चौथा टप्पा : इसवी ४०० नंतर

महाभारताच्या उत्क्रांतीच्या चौथ्या टप्प्यास इसवीच्या ४ थ्या शतकानंतर सुरुवात झाली. इसवीच्या सहाव्या शतकातल्या एका दानपत्रात महाभारताला 'शतसाहस्री संहिता' म्हणून संबोधिण्यात आले.[६५] म्हणजेच तोपर्यंत महाभारताने आजचे १ लाख श्लोकांचे शरीर धारण केले होते असे मानावयास हरकत नाही. एवढेच नव्हे तर आता त्याच्याभोवती पावित्र्याचे वलयदेखील निर्माण झाले होते. निव्वळ इतिहास व पुराण ह्या चौकटीतून बाहेर पडून ते वेदांच्या बरोबरीने संहिता म्हणून गणले जाऊ लागले होते. मंदिरे, धार्मिक मेळावे इत्यादी ठिकाणी त्याची पारायणे होऊ लागली होती. त्याच्या केवळ श्रवणाने पापक्षालन होऊन स्वर्गप्राप्ती होऊ शकते अशी श्रद्धा निर्माण झाली होती. ह्या परिस्थितीत त्याच्या शब्दप्रामाण्यात ढवळाढवळ करण्याचे साहस कुणी करू धजेल हे फारसे संभवनीय नव्हते. त्यामुळे इसवीच्या ४–५ व्या शतकानंतर महाभारतात जी थोडीफार भर पडली त्याचे नेमके स्वरूप काय होते हे सांगणे फारसे अवघड नाही. एकतर ही भर केवळ धार्मिक बाबीतली होती, नाहीतर राजेरजवाड्यांच्या जीवनासंबंधीचा तपशील भडकपणे रंगविण्याकडे कल होता. पहिल्या प्रकारची दोन उत्तम उदाहरणे म्हणजे महाभारताच्या आरंभी आलेले गणेशनमन व विराटपर्वात आलेले दुर्गास्तवन. ह्या दोहोंनाही संशोधित आवृत्तीतून वगळण्यात आले आहे. महिषासुरमर्दिनी दुर्गेची तुरळक शिल्पे इसवीच्या दुसऱ्या शतकापासून दिसू लागतात. पण महाभारतात आलेले दुर्गेचे साग्र–समग्र रूप मात्र गुप्तकालापासूनच दृष्टीस पडते. तसेच एका गजरूपी यक्षाच्या रूपाने किंवा शिवगणाच्या अधिपतीच्या नात्याने गणेशाची ओळख जुनी असली तरी एक शुभंकारी दैवत म्हणून त्याची

प्रतिमा इसवीच्या चौथ्या शतकानंतरच निर्माण झाली. काश्मीरच्या अतिपुरातन शारदा आवृत्तींत गणेश व दुर्गास्तवन न आढळल्यामुळे संशोधित आवृत्तीतून ह्या दोहोंना वगळले. इसवीच्या चौथ्या शतकानंतर जसजसे महाभारताचे संहितेत रूपांतर होऊ लागले तसतसे मध्यंतरीच्या काळात लोकप्रिय झालेल्या अनेक दैवतांचा यात समावेश करण्यात येऊ लागला. स्तवनांच्या रूपाने अगदी उघडपणे आत शिरू पाहणाऱ्या काही दैवतांना संशोधित आवृत्तीने बाजूला काढून पुढील संशोधकांचा मार्ग मात्र सोपा केला आहे.

दुसऱ्या प्रकारच्या भरीचे ठळक उदाहरण म्हणजे विराट पर्वाच्या ३८ व्या अध्यायात आलेला एक सहा श्लोकांचा समूह.[६६] ह्या श्लोकसमूहात सोन्याचे नक्षीकाम केलेल्या चिलखतांची वर्णने आहेत. शंभर लहान ठिपक्यांची नक्षी (शत-बिंदू), शंभर आवर्त अथवा भोवऱ्यांची नक्षी (शतावर्त), शंभर सूर्य (शतसूर्य), शंभर डोळे (शताक्षि) अशी ह्या नक्षीकामांची नावे देण्यात आलेली आहेत. अगदी हुबेहूब अशी चिलखते बाणाच्या कादंबरीत येतात.[६७] ह्या दोहोंत केवळ वर्णनसाधर्म्य आहे एवढेच नव्हे तर शब्दास शब्द एवढे साधर्म्य आहे. येथे प्रश्न पडतो तो असा की नक्की कोणी कोणाचे उचलले? बाणभट्टासारख्या प्रतिभावंत लेखकाने महाभारतातले वर्णन अगदी तंतोतंत उचलले असे मानणे म्हणजे त्याच्या प्रतिभेचा अवमान करण्यासारखे आहे. उलटपक्षी बाणाच्या लेखनाशी परिचित असलेल्या एखाद्या पोथी नकलकाराने अथवा एखाद्या क्षुद्र कवीने न राहवून अत्युत्साहाने हे वर्णन महाभारतात घुसवून दिले असण्याची शक्यता अधिक. जेथे सहजपणे हे करणे शक्य होते, तेथे संधी गमविण्यात आलेली नाही. पण अशी हुकमी संधी सबंध महाभारतात एकाच ठिकाणी येते. ह्यावरून नंतरच्या काळात महा-भारतात नवी भर घालणे किती अवघड होऊन बसले होते ते दिसते. इतरत्र चिलखताचे उल्लेख अनेक आहेत. पण विराटपर्वातल्या ह्या सोन्याने मढविलेल्या चिलखतांपुढे इतर सारी निस्तेज दिसतात. बाणभट्टाच्या काळीं, इसवीच्या आठव्या शतकात अशी चिलखते राजघराण्यातील मातब्बर व्यक्ती वापरीत असाव्यात. कादंबरीच्या आपल्या सांस्कृतिक अध्ययनात डॉ. वासुदेवशरण अग्रवाल ह्यांनी ह्या चिलखतांची तुलना ४–५ व्या शतकातल्या ससानियन धातुकामांशी केली आहे.[६८] ससानियनकालीन इराण व गुप्तकालीन भारत यांचे आपसात घनिष्ट सांस्कृतिक व व्यापारी संबंध होते. त्यातूनच पुढे कलेच्या प्रांतात असे नवे प्रयोग झाले असावेत.

ऐतिहासिक काल : पार्श्वभूमी

अशा प्रकारे इसवीच्या ७–८ व्या शतकांपर्यंत महाभारतात नवे काही ना काही येतच राहिले. हा प्रकार पुढेही चालू राहिला. ह्याचे प्रत्यंतर आज उपलब्ध

असलेल्या हस्तलिखितांवरून येते. जुन्यातले जुने हस्तलिखित १४ व्या शतकाच्या पलीकडे जात नाही. महाभारताचा एकंदरीत ढाचा जरा सैलच होता. त्यात वेळोवेळी भर घालणे, थोडाफार फेरफार करणे, नव्याने हात फिरविणे असे प्रकार सहज चालून जात. ६ व्या शतकानंतर देशभर त्याच्या हस्तलिखित प्रती तयार होऊ लागल्या. पुढे पुढे तर ह्या प्रती वेगवेगळचा प्रांतीय लिप्यांतून तयार करण्यात येऊ लागल्या. आणि मग त्यात कोणी, कशी व कोठे भर घालावी ह्यावर नियंत्रणच राहिले नाही. प्रत्येक छोटचा-नाटचा कवीने, पोथीकाराने आणि नक्कलकाराने ह्या कामी हातभार लावला व 'आपले' म्हणून थोडेसे काहीतरी महाभारतात शिरकावून दिले. हे 'आपले' सुद्धा बहुतेक वेळा इतर प्रथितयश महाकाव्यांचे अनुकरणच असावयाचे. असे होता होता महाभारताचा अवाढव्य वटवृक्ष झाला, त्याला अनेक पारंब्या फुटल्या. ह्यातलीच एक तामिळनाडची ग्रंथ आवृत्ती. इतर सर्व प्रांतीय आवृत्त्यांना मागे टाकून प्रमाणाबाहेर फुगलेली, भडक वर्णनांनी समृद्ध. प्रत्येक कथाप्रसंग रंगवून सजवून सांगणारी. इतर आवृत्यांच्या बाबतीतही कमीजास्त प्रमाणात हेच घडले. ह्यानंतरच्या काळातले, इसवीच्या ७–८ व्या शतकानंतरचे महाभारताचे बहुतेक कवी ह्या ना त्या राजदरबाराचे आश्रित असत. त्यामुळे राजसभा, राजप्रासाद, राजपुत्रांचे विलासी जीवन इत्यादींचे बारीक-सारीक तपशील रंगविण्याकडे त्यांचा कल होता. क्षत्रिय कुलावतंसांची युद्धकथा ह्या नात्याने महाभारताचे आकर्षण फार मोठे आहे. क्षत्रिय वीर व त्यांचे ब्राह्मण आश्रित ह्याव्यतिरिक्त समाजातील इतर वर्गांना महाभारतात फार दुय्यम स्थान आहे. म्हणून वेळोवेळी महाभारतात जी भर पडत गेली ती राजेरजवाडयांच्या जीवनातील तपशिलासंबंधीच. परिणामी महाभारताच्या पानापानातून उभे असलेले क्षत्रिय राजपुत्र कोण्या एका कालाचे बंदिस्त राहिलेले नाहीत. शतकानुशतकांच्या प्रेरणेतून हे रांजबिंडे वीर साकार झाले आहेत. थोडे विस्तृतपणे सांगावयाचे झाल्यास एखाद्या राजाच्या तैलचित्राचे उदाहरण देता येईल. पिढचान्‌पिढचा अनेक चित्रकार ह्यात नवनवे रंग व तपशील भरत राहिले. शेवटी जो राजा उभा राहिला तो कोण्या एका काळाचा वा देशाचा राजा नसून काल्पनिक राजा होता. महाभारतात नेमके हेच झाले आहे. पिढचान्‌पिढचांच्या कविकल्पनांतून साकारलेले महाभारतातले वीर, त्यांचे आपसांतले वैर आणि तुंबळ युद्ध हे ऐतिहासिक सत्यासत्यतेपलीकडचे आहेत. आणि त्यामुळे कोण्या एका स्थळाची माती उकरून त्यात महाभारताला शोधीत बसणे म्हणजे मृगजळामागे धावणे आहे.

त्यापेक्षा विरुद्ध दिशेचा मार्ग जास्त सोपा आहे. महाभारतातले लहान-सहान तपशील बाजूला काढून, त्यांना पुरातत्त्वीय पुराव्याशी ताडून पडताळून पाहून त्यांची तिथी निश्चित करता येते. अगदी हळूहळू हा कालानुक्रमाचा डोलारा वाढवीत जाता येतो. असाच एक प्रयत्न ह्या पानांतून करण्यात आला आहे. मात्र

ह्यापेक्षा अधिक पुढे जाणे ह्या घडीला तरी शक्य नाही. मुख्य अडचण आहे तुट-पुंज्या उत्खनित पुराव्याची. आगामी कालात ही तूट भरून निघेल आणि भरीव शास्त्रीय पुरावा उपलब्ध होऊ शकेल. आणि त्या आधारे महाभारतातील घडामोडींचा एक नवा अर्थ लावणे शक्य होईल. मात्र तोपर्यंत महाभारतांतल्या श्लोकाश्लोकांत शतकांचे अंतर असल्याची जाण मनाला बोचत राहील. संशोधित आवृत्ती तयार करताना हीच टोचणी सुखटणकरांच्या मनाला लागून राहिली होती.[६९] शेवटी एवढेच म्हणता येईल, की महाभारताच्या प्रत्येक श्लोकागणिक त्याची तिथी ठरवावी लागेल हे प्रसिद्ध जर्मन विद्वान विंटरनिट्झ ह्यांचे जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वीचे मत[७०] आजही तितकेच खरे आहे.

■ ■

संदर्भ आणि टीपा

१. आदिपर्व, ५७.७४. ह्या लेखात येणारे महाभारतातले सर्व संदर्भ भांडारकर इन्स्टिटयूटने संपादिलेल्या महाभारताच्या संशोधित आवृत्ती-तले आहेत.

२. आदि. १. ६१.

३. Agrawala V. S., *India as known to Panini* (Lucknow, 1963), p. 111

४. Macdonell A. A. and Keith A. B., *A Vedic index to names and subjects* (London, 1912), Vol. 1, p. 74.

५. Kangale R. P., *Kautiliya Arthasastra* (Bombay, 1960), Vol. 1, p. 63.

६. विनयपीटक, खंड १, पृ. २१०, २२४, २२६; खंड ४, पृ. ११२ (ओल्डेनबर्गने संपादित केलेली आवृत्ती).

७. उद्योगपर्व, ३८.५; शांतिपर्व, २०५.१२; अनुशासनपर्व, ६१.७८; आश्वमेधिकपर्व, ८६.२१.

८. द्रोणपर्व, ११८.४२.

९. भीष्मपर्व, ९३.८२; कर्णपर्व १७.१०९.

१०. Dhavalikar M. K., *Sanchi : a cultural study* (Poona, 1965), p. 21.

११. Motichandra, ' *Costumes, textiles, cosmetics and coiffures in ancient and medieval India* (Delhi, 1973), p. 14.

१२. कर्णपर्व, ६.३८
१३. आश्वमेधिकपर्व, ७२.५
१४. आदिपर्व, १८१.३
१५. सौप्तिकपर्व, २६.२८; अनुशासन, १५४.९
१६. द्रोणपर्व, ६.२४; २२.३८
१७. आरण्यकपर्व, १९४.१५; भीष्मपर्व, १०२.५७; शांतिपर्व, ४५.१५
१८. सभापर्व, १९.३
१९. विनयपीटक, खंड १, पृ. २२८.
२०. Sinha B. P. and Narain L. A., *Pataliputra excavation, 1955-56* (Patna, 1970), p 14.
२१. Dikshit M. G. *History of Indian glass* (Bombay, 1969), p 162.
२२. Thapar B. K.. " Maski 1954 : A Chalcolithic site of Southern Deccan, " *Ancient India* No. 13.
२३. Dikshit (1969), *op cit*., p. 162.
२४. *Ibid*, p. 3.
२५. Marshall Sir John, *Taxila* (Cambridge, 1951), Vol. 2, p. 730.
२६. Dikshit (1969), *op cit*., p. 24.
२७. *Ibid*, p. 8.
२८. द्रोणपर्व, १३०.२३, तळटीप १११७.
२९. आदिपर्व, २१३.६२; उद्योगपर्व, १५३.३२; द्रोणपर्व, ८७.६०; शांतिपर्व, २९.११७.
३०. विराटपर्व, २१.१०.
३१. आदिपर्व, ६७.३.
३२. आदिपर्व, ६७.२; द्रोणपर्व, १९.३५; द्रोणपर्व, १३८.१७.
३३. Agrawala (1963), *op. cit*., pp. 259-69.
३४. Dhavalikar M. K., " The beginnings of coinage in India, " *World Archaeology*, Vol. 6, Part 2 (London, 1975), pp 330-38.
३५. आश्वलायन गृह्यसूत्र, ३.४.४; शाङ्खायन श्रौतसूत्र, १५.१६.
३६. Agrawal (1963), *op. cit*., p. 240.
३७. अर्थशास्त्र, १.६.८; १.६.१०
३८. Puri, B. N., '*India in the time of Patanjali*' (Bombay, 1957), p. 207.

३८ अ. Kangale (1960), *op. cit.*, p. 68
३९. उद्योगपर्व, १२४.१०; द्रोणपर्व, ५८.७.११; कर्णपर्व, १५.४१; शल्य-पर्व- २५.२१
४०. विनयपीटक, खंड २, पृ. ११०
४१. सभापर्व, ४८.३०
४२. Thapar (1957), *op. cit.*, p. 12; Thapar, B. K., "Prakash 1955 : A chalcolithic site", *Ancient India*, Vol. 20–21 (New Delhi, 1964), p. 111
४३. Agrawala (1963), *op. cit.*, p. 23
४४. Marshall (1951), *op. cit.*, pp. 730,734
४५. अर्थशास्त्र, २.१८
४६. Sharma, G. R., *Excavations at Kaushambi, 1957-59* (Allahabad. 1960), pp. 22, 45
४७. *Ibid*, pp. 45, 46
४८. सभापर्व, ४७.२२
४९. Schoff, W. H, *Periplus of the Erythraean Sea* (London, 1912), pp. 171–72
५०. सभापर्व, ४७.७, १९.२३
५१. Motichandra, *Geographical and economic studies in the Mahabharata or the Upayanaparva* (Lucknow, 1945)
५२. उद्योगपर्व, ८४.१०
५३. सभापर्व, ४७.३,७; १९.२३
५४. शांतिपर्व, ३१२.४२
५५. Motichandra (1973), *op. cit.*, pp. 21–25
५६. Marshall (1951), *op. cit.*, p. 656
५७. Rowland B., *Art and Architecture of India* (London, 1967), p. 66
५८. Motichandra (1973), *op. cit.*, p. 21–25
५९. आदिपर्व, २१२.१३–१४
६०. आदिपर्व, १८९.१४
६१. Piggott S., "Throne fragments from Pataliputra," *Ancient India* No. 4 (Delhi, 1947–48), p. 103

६२. Krishnamurthy, K, *Nagarjunakonda : A Cultural Study* (Delhi, 1977), pp. 161-62.
६३. Piggott (1947-48), *op. cit.*, p. 101
६४. Dhavalikar, M. K., *Ajanta : A Cultural Study* (Poona, 1973), p. 92.
६५. Winternitz, M., *History of Iudian literature* (New Delhi, 1972), vol. 1, p. 463.
६६. विराटपर्व, ३८. २०–२५
६७. अग्रवाल वासुदेवशरण, कादम्बरी : एक सांस्कृतिक अध्ययन (वाराणसी, १९५८), पृ. १३, तळटीप १
६८. पूर्वोक्त, पृ. ११२–१३.
६९. Sukthankar, V. S, "Prolegomena", *Sukthankar Memorial Volume* (Bombay, 1944), Vol. 1, p. 129.
७०. Winternitz (1972), *op. cit.*, p. 475.

Mahabharata : An archaeological perspective

Summary

The Mahabharata is a gigantic work. The bulk was grown over centuries due to the continuous accretion of new matter. The fluidity and the loose chronological set up of its text, however, thus rendered its evidence historically meaningless. The present article is an attempt to put the Mahabharata material in its proper chronological perspective and thus make it historically more meaningful.

A new set of criteria has been used towards achieving the end mentioned above, namely finds from well-stratified archaeological sites.

Four distinct phases of growth in the life of the Mahabharata can thus be clearly visualised. Phase I goes back to a pre-historic (pre-500 B. C.) period. The evidence for the distant origins of the Mahabharata is however, mainly

negative. The absence of certain distinct historical developments e. g. coinage automatically push back the date to a remote antiquity. Phase II coincides with the early Historical Period (500–100 B. C.). The proliferation of iron weapons and the presence of certain commercial goods from the South are the hallmark of this phase, which witnessed a major reshaping of the Mahabharata material, particularly the great war and its assemblage. The process of additions had slowed down in Phase III (100–400 A. D.), so that they can be more easily singled out from amidst the vast bulk of the Epic. Luxury goods indigenously manufactured and imported over long distances during the flourishing period of Indo-Roman trade are a special feature of these centuries. Phase IV (400 A. D. onwards) contains mainly didactic additions. Thus the evolution of the Mahabharata can be traced with a fair degree of chronological precision with the aid of archaeological and historical evidence.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४:१, जुलै १९८५

नाना फडणिसाच्या कालातील पुणे कोतवाली (१७७४--९६)

म. रा. कुलकर्णी
पुणे विद्यापीठ, पुणे

नाना फडणिसाच्या प्रशासन-व्यवस्थेचा अभ्यास करीत असता या कालात पुणे शहर कोतवालीचे स्वरूप कशा प्रकारचे होते ? कामकाजाची पद्धती कशी राहिली ? या व्यवस्थेत काही त्रुटी वा दोष होते का ? त्याबद्दल कोणास जवाबदार मानावे लागेल ? नाना फडणिसाने प्रस्थापित व्यवस्थेत काही मूलभूत बदल केलेले दिसून येतात का ? एकंदर पुणे कोतवालीच्या कारभारास वा गैरकारभारास नाना फडणिसाकडून कितपत हातभार लागला ? या साऱ्या प्रश्नांचा विचार करावा लागतो.

त्या दृष्टीने अभ्यास करीत असता डेक्कन कॉलेजच्या मेणवली संग्रहात रुमाल क्र. ४६, ७५ आणि ७७ यातून सुमारे ११० पत्रे निव्वळ कोतवाली कारभारासंबंधी आढळून आली. तसेच पुण्याच्या पेशवेदप्तरात नाना फडणीस खाजगी रुमाल क्र. १९, १००, १३५ यातून सुमारे १०।१५ पत्रे या विषयाशी संबंधित दिसून आली. याखेरीज पुणे कोतवालीचे म्हणून स्वतंत्र ५६७ ते ५७८ या क्रमांकांचे रुमाल असून त्यात वर्षवारीने ताळेबंद प्रामुख्याने आढळले. ही सर्व कागदपत्रे अप्रकाशित, अस्सल असून घाशीराम आणि आनंदराव या दोन कोतवालांच्या कारकीर्दीतील (१७७७–९६) असल्यामुळे उत्तर पेशवाईतील कोतवाली व्यवस्थेवर प्रकाश टाकणारी म्हणून संशयातीत मानावी लागतात. या कागदपत्रांतून कोतवालाच्या विविध जबाबदाऱ्या, त्याच्या हाताखालील अधिकारी, त्याना मिळणारे वेतन, ठिकठिकाणच्या चावड्यांवरील कामकाजाची आणि हिशोबाची पद्धती, उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या प्रमुख बाबी, सालोसाली आलेले एकूण उत्पन्न आणि झालेला खर्च, गुन्ह्यांचे विविध प्रकार आणि त्यासाठी झालेला दंड इ. विषयी तपशीलवार माहिती येते.

प्रस्तुत निबंधात या उपलब्ध माहितीच्या आधारे नाना फडणिसाच्या प्रशासन कालातील (१७७४–९६) पुणे कोतवालीचे एक सलग चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

मराठी राजकारणाचे मुख्य केंद्र नानासाहेब पेशव्याच्या कालात पुण्यास आले (१७५०) तेव्हापासून मराठी राज्याची राजधानी म्हणून पुणे शहराची विशेष भरभराट होत गेली. महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक उलाढालींचे पुणे हे केंद्र बनले. पेशव्यांप्रमाणेच त्यांचे नातेवाईक, सरदार, सावकार यांचे मोठे वाडे पुण्यात उभे राहिले. व्यापार उदीम वाढून लोकसंख्या वाढू लागली.

पानिपतच्या आघाताने पुण्याच्या वैभवास काहीशी अवकळा आली (१७६१). तथापि थोरल्या माधवरावांनी अल्पकाळात कारभाराची घडी बसविली आणि पुण्याच्या वैभवास पुन्हा चालना दिली. या काळात वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारा शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची गरज पेशव्यांना वाटू लागली. म्हणून बाळाजी नारायण केतकर यास पुणे शहराचा कोतवाल म्हणून नेमण्यात आले (१७६४).

इ. स. १७६४ ते ७१ या सात वर्षांच्या कालात या जागेवर गिरमाजी, बळवंतराव पेंडसे, बाबुराव राम, जनार्दन हरि वर्तक आणि केशवराव बल्लाळ केतकर यांनी काम केलेले आहे.[२]

इ. स. १७६९ मध्ये थोरल्या माधवराव पेशव्यांनी जनार्दन हरि वर्तकास कोतवालीची सनद देताना, कोतवालाने कोणती कामे करावीत याची कलमबंदी दिलेली पेशवे-दप्तरात दिसून येते, ती अशी[३]–

पेठातील किरकोळ कजिये कमावीसदारानी मनास आणावे मातबर असल्यास कोतवालापुढे आणावे कलम १ बाजारनिरखाची (भाव) याद दररोज दप्तरी आणावी कलम १ सरकारला बेगारीचा (मजुराचा) पुरवठा करणे कलम १ पाटदामाचे १। रु. शेला किंमत १ रु. वसूल करावे कलम १ पेंढारी, बाजेकरी याचेकडून उदीम पाहून शिरस्तेप्रमाणे वसूल घेत जावा कलम १

नव्या मापावर शिक्के करणे, जुन्याची चौकशी करणे कलम १ तेलीयाचे घाण्यास दररोज रुके ८३ घ्यावे कलम १, खानेसुमारी करावी त्याचा झाडा राखावा कलम १, कोतवालाचे चिठीखेरीज कोणी जुवा खेळू नये कलम १, सोद्याकडून शिरस्तेप्रमाणे कर घेणे कलम १, सोद्याखेरिज इतरानी जुवा खेळो नये कलम १, जाणार येणार कुल कोतवालीकडे दाखल व्हावे कलम १, कोतवालीचा दरमाहाचा हिशोब सरकारात देणे कलम १, घर जाग्याची खरेदी विक्री तुमचे इतल्याने व्हावी कलम १, रुपये ३२६४ चौकशीने खर्च करावे भोजन खर्च, तैनात (पानसुपारी) खर्च, दप्तरखर्च रोशनाई (दिवाबत्ती) इ. कार्यकारण किरकोळ खर्च करणे कलम १.

याच पत्रात माधवरावांनी नाना फडणिसास आज्ञा केली आहे की.... 'शहरसंमधे जो जो जाबसाल पडेल तो त्यास करावयास सांगितला असे. त्याचे हातून तो तुम्ही करवून घेणे. परस्पर कुणास सांगून विल्हे लावू नये....'

प्रारंभीच्या कालातील पुणे कोतवालीचे स्वरूप आणि शिस्त स्पष्ट करून दाखवणारे हे पत्र असल्यामुळे विशेष महत्त्वाचे मानावे लागते. थोरल्या माधवरावांनी घालून दिलेल्या शिस्तीचेच अनुकरण नंतरच्या काळात नाना फडणिसाने केलेले आहे.

सवाई माधवरावाचा काळ (१७७४–९५) मराठी राज्याचा ऐन वैभवाचा मानला जातो. या काळात पुण्याचा लौकिक सर्वदूर होऊन हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून व्यापारी, कलावंत, कारागीर, विद्वान शास्त्रीपंडित पुण्यास स्थायिक होऊ लागले. पुण्याच्या वाढत्या लोकवस्तीबरोबर कोतवालावरील कामाचा ताणही वाढत गेला.[४]

पुणे शहराचे अत्यंत करडे, जुलमी आणि भ्रष्ट अंमलदार म्हणून घाशीराम आणि आनंदराव या कोतवालबंधूंची कारकीर्द पुणेकर जनतेच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरली. बारभाईच्या सुरुवातीस (१७७४–८१) पुण्याचा कोतवाल म्हणून आनंदरावाचे नाव आढळून येते. त्यानंतर १७९१ पर्यंत घाशीराम त्या जागेवर दिसतो. घाशीरामाचे पारिपत्य झाल्यावर १७९६ पर्यंत कोतवाली पुन्हा आनंदरावास देण्यात आली.[५]

आनंदरावाच्या नंतरच्या कारकिर्दीतील (१७९६) बदकर्माबद्दल पकडल्या गेलेल्या बायकांची एक यादी डेक्कन कॉलेजच्या मेणवली संग्रहात पाहायला मिळते. या यादीवर नाना फडणिसाच्या हातचा शेरा आहे. त्यात तो म्हणतो....' कोतवाल हे शहराचे मोठे अधिकारी. ब्राह्मण स्त्रिया निजावयाच्या खोलीत ठेवू नये तथापि ठेविल्या तरी दोन प्यादे रखवालीस ठेवून आपण निराळ्या खोलीत निजावयाचे ते केले नाही असे कोतवाल स्वत: लिहून देतात हे विशेष....' सासुरवासास कंटाळून पुण्यात पोट भरावयास आलेल्या स्त्रीस कोतवालाने बटीक बनवून आपल्या घरात ठेवून घेतले या तक्रारीवरसुद्धा....' सरकारात कळविले नाही हा मोठाच दोष, कोतवालासारख्या अधिकाऱ्याने असे वागायला नको होते.... ' एवढाच अभिप्राय नाना फडणिसाचा आहे.[६] या गैरव्यवहाराबद्दल आनंदरावास नानाने साधा जाबही विचारलेला नाही. मग त्याबद्दल शिक्षा वगैरे करणे तर दूरच. पुण्यात पोट भरावयास येणाऱ्या स्त्रियांना आनंदराव वाईट कर्मास लावतो या तक्रारीचीही नानाने कोणतीही दखल घेतलेली दिसत नाही. अशाच आरोपासाठी पकडलेल्या स्त्रीस काही दिवस किल्ल्यात कैदेत ठेवावे अशी नानाची आज्ञा असताना कोतवालाने सदर स्त्रीस बटीक म्हणून विकले आहे. अशा अनैतिक गुन्ह्याप्रमाणेच आनंदराव इतरही मार्गाने लोकांस त्रास देत असे. कोतवालीचे काम मिळविण्यासाठी सदाशिव त्रिंबक याने नानाकडे विनंती केल्याचे समजल्यावरून आनंदरावाने त्याला चौकीत डांबून त्याचा नाना प्रकारे छळ केला.[७] त्याबद्दल तक्रार करताना सदाशिव त्र्यंबक नानास लिहितो, ' दरबारखर्च घेऊन च्यार महिने आम्हास हिसक्यात घातले, कालपासोन

आनंदरावाने आम्हास बहुत तसदी दिली की तुम्ही बोलता (कोतवालीचा मक्ता) हे काय ? आम्हास सरकारची ताकीद आहे की कोणी कोतवालीसंबंधी बोलेल त्यास चौकीत बसविणे'....उपरोक्त उदाहरणावरून आनंदराव स्वतःची इच्छा रयतेवर कशा प्रकारे लादीत असे याची कल्पना येऊ शकेल. कोतवालाने नेहमी जागरूक राहून ज्यायोगे सरकारचा नफा होईल अशी कामगिरी शोधून काढावी अशी नानाची आज्ञा होती. त्यानुसार ५० हजार रुपयांची सरकार किफायत होण्याजोगे काम आहे म्हणून आनंदरावाने नानाची एकांतात भेट मागितली आहे.

आनंदरावाच्या गैरव्यवहाराची, जुलमाची माहिती नाना फडणिसास असूनही त्याकडे नानाने पूर्ण डोळेझाक केलेली दिसून येते. अखेर १७८२ मध्ये कोतवालीवरून त्यास दूर करून त्याचा भाऊ घाशीराम सावलदास वाचासुंदर यास कोतवालीवर नेमले.[८] घाशीराम भारद्वाज गोत्री, देशस्थ ब्राह्मण. मूळचा औरंगाबादचा, पण नशीब काढण्यासाठी १७७५ मध्ये पुण्यास आला. अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्व, लाघवी स्वभाव, बहुश्रुतपणा या भांडवलावर अल्पकाळात त्याने नाना फडणिसावर आपली छाप बसविली.

बारभाईच्या सुरुवातीच्या काळात नानास असलेली पैशाची नड घाशीरामाने भागविली म्हणून इ. स. १७७७–७८ साली पुण्याची कोतवाली घाशीरामास देण्यात आली असावी. या अल्प कारकिर्दीत घाशीरामाने नानाची मर्जी संपादन केली असली पाहिजे. इ. स. १७८२ मध्ये आनंदरावास कोतवालीवरून दूर करताच नानास घाशीरामाची आठवण झाली असावी.

घाशीरामास कोतवालीवर नेमताना प्रथमच कोतवाली शिक्का आणि मोर्तब तयार करण्यात आले.[९] त्याचे वजन ६८= तोळे असून त्याला ६।।= रु. (६ रु १० आणे) खर्च आला. शिक्क्यावर—

'श्रीमंत चरणी तत्पर
घासीराम सावलदास
कोतवाल शहर पुणे
निरंतर....'

असा मजकूर आहे.

या शिक्क्याबरोबर कोतवालास तांब्याची नक्षीदार दौत, रुप्याच्या म्यानाची एक कटयार देण्यात आली. या प्रसंगी पुन्हा एकदा कोतवालाने कोणत्या प्रकारे काम करावे याची जाणीव करून देण्यात आली ती अशी—

'कोतवालाने सर्व कामकाज घरी न करता चावडीत बसूनच केले पाहिजे. सरअमिन आणि कोतवाल यांनी परस्पर विचाराने, एकमेकाशी कोणतीही प्रतारणा न करता वागावे. कारकून प्यादे यांची नेमणूक अगर बडतर्फी करणे झाल्यास एकमेकाच्या सल्ल्याने करावी. हर प्रकारे रयत आबाद राखावी. मागील वहिवाट

पाहून त्या दाखल्यानुसार वागावे. कोतवाल याने गैरवाजवी परिच्छिन्न न वागावे....' या ताकिदीवरून कोतवालाच्या स्वैर कारभाराची, जुलमांची कल्पना नाना फडणिसास निश्चितपणे होती असे म्हणता येईल.

इ. स. १७८२ मध्ये घाशीरामाच्या ताब्यात मुख्य चौत्रा आणि सोमवार रविवार, कसबा, वेताळ, गणेश अशा ५ चावड्या असून हाताखाली ९० शिपाई नेमून दिलेले होते. घाशीरामाच्या विनंतीवरून नारायण आणि शनिवार या पेठांतून आणखी दोन चावड्या वसवून जादा २५ लोक नेमून देण्यात आले.[१०] चौत्रा आणि या सात चावड्यांवरील दैनंदिन कामाचा व्याप सांभाळण्यास कोतवालाचे हाताखाली सरअमिन, अमिन, दिवाण, दप्तरदार, फडणीस, मुजुमदार असे दुय्यम अधिकारी असून ते पूर्णपणे कोतवालाच्या हुकमतीखाली असत. याशिवाय कारकून, प्यादे, स्वार, जासूद, नजरबाज (गुप्तहेर) अशा १२४ जणांचा ताफा स्वतंत्र असे. इ. स. १७९८ मध्ये त्यात १०० गाडदी, २ दिवटे, १० नजरबाज, १०० स्वार अशा २१२ जणांची भर नंतर घालण्यात आली.[११]

सरकारी प्रशासन यंत्रणेचा एकूण विचार केला तर कोतवाल तसा छोटासा अधिकारी होता. पण त्याचे हाती दिवाणी–फौजदारी अधिकार एकवटले गेले. त्याला भरपूर स्वातंत्र्य मिळून तो बडा अंमलदार मानला जाऊ लागला. पुण्याच्या कोतवालास कराव्या लागणाऱ्या कामाचे तपशील पेशवे-दप्तरातील आणि डेक्कन कॉलिजातील संग्रहात आढळून आले.[१२] त्यावरून गावातील भांडणे, मारामाऱ्यांचा निकाल देणे, दंड आकारणे, बाजारभावावर नियंत्रण ठेवणे, वजन-मापांची तपासणी करणे, खरेदी विक्रीचे दस्तऐवज तयार करणे, सरकारला वेठबिगार पुरवणे, लोकसंख्येची नोंद ठेवणे, गावातील गल्ल्या, रस्ते, घरे यांची मोजदाद करणे, गहाळ घरे किती, जप्ती किती, बेवारस किती, सरकार-वाटणीची किती याचा तपशील तयार ठेवणे, गवई, वेश्या, न्हावी यांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवणे, शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या परक्या माणसाची चौकशी करणे, जकात गोळा करणे, रात्री गस्ती, पहारे ठेवून तोफ झाल्यावर शहरात हिंडणाऱ्या माणसाला चौकीत ठेवणे, सार्वजनिक सण, समारंभात बंदोबस्त ठेवणे, श्रावणमास दक्षणेत सुकरता आणणे, सरकारी पाहुण्यांची बडदास्त राखणे, सरकारविरुद्धच्या कटकारस्थानाची बातमी राखून सरकारात वेळीच कळविणे, नवा हुकूम जारी करताना, जुना रद्द करताना दौंडी पिटवणे, चावड्यांवरील हिशोब दरमहा सरकारास दाखवणे, सरकारी कायदे मोडणाऱ्यांपासून दंड वसूल करणे, बेवारस इस्टेट सरकारजमा करणे, वाहतुकीसाठी रस्ते दुरुस्त राखणे, अनधिकृत बांधकामे नष्ट करणे, बाजारातील वस्तूंवर सरकारी शिक्के मारणे, पेठा वसवून व्यापार उदीम वाढता ठेवणे, शहरातील अनैतिक गुन्ह्यांचा छडा लावून दंड वसूल करणे, पांथस्थ, बैरागी यांच्या राहण्या-जेवणाची सोय करणे, सरकारी कैद्यांची देखभाल करणे, निसर्गात होणारे

चमत्कार (वीज, भूकंप, गाईस दोन तोंडी वासरू होणे, विहिरीत उपडी घागर तरंगताना दिसणे, शडेनक्षत्र दिसणे) नोंदवून सरकारच्या कानावर घालणे, इ. कामांचा समावेश दिसून येतो. उपरोक्त नोंदींवरून कोतवाली खात्याचा व्याप नाना फडणिसाच्या कारकिर्दीत किती वाढला होता आणि जनतेशी कोतवालाचा किती घनिष्ट संबंध येत असेल याची कल्पना येऊ शकेल.

कोतवालीची जागा अत्यंत प्रतिष्ठेची, भरपूर अधिकार गाजवता येणारी, अनैतिक मार्गाने पैसा गोळा करता येण्याजोगी बनली. साहजिकच पुण्याची कोतवाली मिळवण्यासाठी मोठा दरबारखर्च, अंतःस्थ, नजर देऊन ती पदरात पाडून घेण्याची स्पर्धा चाले.[१३] सदाशिव त्र्यंबक या उमेदवाराने ४० हजार रुपये रसद (आगाऊ) आणि ७ हजार रु. नानास अंतःस्थ म्हणून कबूल केले आहेत. कृष्णाजी अनंत याने १० हजाराचे कापड, ४०० रु. अंतःस्थ देऊन २५ हजार रुपयांची सरकार किफायत करण्याची हमी दिली आहे. बाळाजी दत्तात्रय याने गणेशपेठ चावडीचे काम मिळण्यास नानास अर्धाशेर केशराचा अहेर केला आहे. जयराम दलाल याने कोतवालीच्या मक्त्यासाठी नानास १५ हजार नजर देण्याची तयारी दाखविली आहे. आनंदरावाने नानास ३० हजार रुपये देऊन कोतवाली मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वांपेक्षा जास्त नजर कबूल करून कोतवाली आपल्याकडे रहावी अशी धडपड आनंदराव आणि घाशीराम यांची चालत असे. हे पैसे कोतवाल विविध मार्गांनी वसूल करणार हे उघड असल्यामुळे कोतवाला-विरुद्ध कोणी कितीही तक्रारी केल्या तरी त्याची दाद नानाकडे लागत नसे. प्रत्येक ताळेबंदाच्या शेवटी एक कलमबंदी आढळून येते. त्यात सारांशरूपाने कोतवालाची कामे देऊन उत्पन्नाच्या आकारात ५% बातमीदार, २% प्याद्यास, ४% कारकुनास लिहावे अशी ताकीद कोतवालास केलेली आढळते.[१४]

पुणे कोतवालीची दप्तर व्यवस्था पाहण्याच्या दृष्टीने पेशवेदप्तरातील कोतवाली रुमाल महत्त्वाचे ठरतात. रोजखर्ड्यावरून प्रत्येक चावडीवरील दैनंदिन कामकाजाची कल्पना येऊ शकते. त्यावरून प्रत्येक चावडीचा दरमहाचा जमाखर्च तयार केला जाई. मुख्य चावडीत सर्व चावड्यांचा मिळून तिमाही अथवा सहा-माही ताळेबंद तयार करून कोतवाली जमाखर्चाची कल्पना नाना फडणिसास दिली जाई.[१५] या ताळेबंदातील खर्चाच्या बाजूस महाल मजकूर या मोठ्या खात्या-खाली रोशनाई (दिवाबत्ती), दसरा, सिमगा, मजुरी, बंदिवानखर्च, कारकून, शिपाई यांचे वेतन, धर्मादाय, तैनातखर्च (पानसुपारी) भोजनखर्च, देहनगी, नजर, अहेर, खैरात, तश्रीफ (आदरसत्कार), मयत, बेवारस, इमारत ही छोटी खाती आढळतात. तर जमेच्या बाजूस खंडगुन्हेगारी, डाका, नजर, पाटदाम, बैतलमबेसी (बेवारस मालाच्या विक्रीचे उत्पन्न), बटछपाई (बाजारातील माला-वर सरकारी शिक्के), चौथाई, दौडी हरकी (दाव्यात विजयी पक्षाकडून घेतलेला

कर), कबाले (स्थावर इस्टेटीच्या व्यवहारावरील कर), सिलकावण (वरिष्ठ अधिकाऱ्याने कनिष्ठास केलेला दंड), वाजेवाले (कनिष्ठ धंदा करणारे), जुवेवाले अशी खाती आढळून येतात. या ताळेबंदातील खंडगुन्हेगारीचे खाते बारकाईने पाहिले असता अनैतिक स्वरूपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त दिसून येते. त्यावरून तत्कालीन सामाजिक नैतिक पातळी लक्षात येऊ शकते.

घाशीराम कोतवालाच्या कारकिर्दीतील (१७८२) एका टाचणात सातही चावड्यांतून एका महिन्यात सर्व खात्यांवर किती रकमा खर्ची पडल्या त्याचे एक कोष्टक पाहायला मिळते. त्यावरून एका महिन्यात खातेवार झालेला खर्च चटकन लक्षात येतो. याच पद्धतीने दुसऱ्या एका टाचणात प्रत्येक चावडीवरील सहा महिन्यांची खातेवार खर्चाची मांडणी पाहायला मिळते. तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने ही कोष्टके महत्त्वपूर्ण आहेत.

पेशवे दप्तरातील संग्रहात कोतवाली खात्याचे सालवार जमाखर्च पाहायला मिळतात. त्या आधारे जमाखर्चाचे कोष्टक केले तर उत्पन्नाच्या चढउताराची कल्पना येऊ शकेल.

इ. स.	जमा	खर्च
१७६९	१२१३८॥=	५४१२।≡।
१७७६	२५९७५।=।	१७८८९॥।=॥।
१७७७	३६९५८	३०७३५॥।=
१७७८	२५५००।-	१८०६७॥=
१७७९	३८२५५=	२५९४७॥
१७८०	४५६२५।	२८३७७॥
१७८१	३९४४०।=॥	२५२५१॥=
१७८२	२५३३९॥=	१८५३२॥≡।
१७८३	४०२७०	३०९२५॥≡
१७९१	३८००३॥=	२२३६७।≡।
१७९२	२७९६६	१७०१८॥=
१७९३	३६१८०	२९३४४।=
१७९४	३५५१४॥=॥	२०१४७॥·॥

कोतवाल आणि त्याचे दुय्यम अधिकारी यांना मिळणाऱ्या वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आढळतो : [१६]

रु. ६२१ कोतवाल
५०० ऐन
१२१ दिवट्या, अफतागिरीबद्दल
६२१

रु.	४१५	पांडुरंग कृष्ण सरअमिन
रु.	३२५	गोविंदराव दिवाण
रु.	४००	गंगाधर शामजी अमिन
रु.	२९०	बाळाजी कृष्ण मुजुमदार
रु.	२००	भिकाजी महादेव फडणीस
रु,	१५०	नारो शंकर दप्तरदार
रु.	१२५	जगन्नाथ श्रीधर कारकून
रु.	४२३॥	सिबंदी
	६९४९॥	एकूण खर्च रु.

नाना फडणीस आणि कोतवाल यांचे परस्पर–संबंधावर प्रकाश टाकणारी काही पत्रे मेणवली संग्रहात पाहायला मिळाली. पुण्याच्या जनतेत आपल्या जुलमाने अप्रिय बनलेल्या या कोतवाल बंधूंवर नानाची मात्र मर्जी बहाल होती. सर अमिन पांडुरंग कृष्ण याचा आपल्यास अडथळा होतो असे वाटून त्याचे विरुद्ध अनेक खोटे आरोप घाशीरामाने एका पत्रात केलेले आहेत.[१७] उत्तरादाखल सरअमीनने सत्य-परिस्थिती नानाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करूनही त्याची नारायण-पेठेतील चावडी काढून घेण्यात आली आणि चांगले काम केल्याबद्दल घाशीरामास १ हजार रु. बक्षीस दिलेले आहेत. घाशीरामाच्या मुलाच्या लग्नात १५०० रु.चे दागिने, १२०० रु. अन्नखर्च आणि ७०० रु. रोख नानाने अहेर केला आहे. या-वरून उभयतातील स्नेहसंबंधाची कल्पना येऊ शकेल. इ. स. १७९१ च्या श्रावण-मास दक्षिणेत कोतवालाच्या कोठडीत २२ तेलंगी ब्राह्मण मृत्यू पावले. पुण्यात हजारो ब्राह्मणांनी पेशव्यापुढे धरणे धरले. या प्रसंगी नानाने घाशीरामास आपल्या घरात आश्रय देऊन त्याचा शक्यतो बचाव करण्याचा प्रयत्न केला. सवाई माधव-रावाने विशेष आग्रह धरल्यामुळेच या प्रसंगी घाशीरामाचे पारिपत्य होऊ शकले. बाबुराव आपटे सातार्‍याहून नानास एका पत्रात लिहितो,[१८] 'घाशीराम कोतवाल याने लबाडी केली. तो शासन पावला वर्तमाने कळली लटकीच वाटत. स्वामीस लिहावे तर परक्याचे असेल तर लिहावे'....घाशीरामावरील नानाचा लोभ सर्व-परिचित असल्याने त्याची गैरवागणूक ठाऊक असूनही ती बोलण्याचे धाडस कुणाला होत नव्हते असे दिसते. घाशीरामाचे पारिपत्य झाल्यावर पुण्याची कोतवाली त्याचेपेक्षा जुलमी म्हणून बदनाम ठरलेल्या आनंदरावास देण्यात आली.[१९] यावरून नानाच्या मनातील त्यांचेविषयीचा लोभ कमी झाल्याचे दिसून येत नाही.

आनंदराव आणि घाशीराम यांच्यात अधिक जुलमी कोण हे ठरविणे वरील विवेचनावरून कठीण जाते. उभय कोतवालांच्या कारकिर्दी पाहिल्या असता नाना फडणिसाच्या एकांगी कारभारावर चांगला प्रकाश पडतो. वरिष्ठाचे कनिष्ठाशी

असावेत त्याहीपेक्षा अधिक स्नेहाचे संबंध या कोतवालांशी नानाचे होते या मताला कागदोपत्री आधारच मिळतो.

पेशव्यांच्या मध्यवर्ति सत्तेचे कोतवालाच्या कारभारावर जेवढे काटेकोर नियंत्रण असायला हवे होते तेवढे नाना फडणीस ठेवू शकलेला नाही. म्हणूनच आनंदराव आणि घाशीराम याची मनमानी दीर्घकाळ चालू शकली, असाच निष्कर्ष या सर्व विवेचनावरून निघू शकेल. प्रत्येक गोष्टीचे उत्कृष्ट नियोजन करण्याचा लौकिक असलेल्या नाना फडणिसास कोतवाली व्यवस्थेचा जनकल्याणाच्या दृष्टीने यापेक्षा अधिक चांगला वापर करून घेता आला असता असे वाटल्यावाचून रहात नाही.

पुणे शहराचे कोतवाल कालानुक्रमे

बाळाजी नारायण केतकर	(१७६४–६५)
गिरमाजी कोतवाल	(१७६५–६७)
बाबुराव राम	(१७६८–६९)
जनार्दन हरि वर्तक	(१७६९–७०)
केशवराव बल्लाल केतकर	(१७७१–७४)
धोंडोपंत बाबाजी	(१७७४–७६)
घाशीराम सावळदास	(१७७७–७८)
आनंदराव	(१७७८–८१)
घाशीराम सावळदास	(१७८२–९१)
आनंदराव	(१७९१–९६)
बाळोजी वासुदेव	(१७९६–९७)
रामचंद्र महादेव दामले	(१७९७)
आपाजी राम	(१७९८)
वासुदेव महादेव जोशी	(१७९८)
बळवंतराव अनंत	(१८०१)

■ ■

Kotwali administration of Pune under Nana Phadnis, 1774-96.

Summary

In the archives of the Deccan College, Pune and the Pune Archives, there are available a large number of un-

published documents relating to the Kotwali (police) administration af Pune during the tenures of two important Kotwals namely, Ghashiram and Anandrao (1777–96). These documents throw light on such subjects as : terms of appointment of Kotwal, nature of his duties, administration of the headquarters and the sub-stations, financial natters including wages of the staff etc, and the successive incumbents of the office. Some aspects of these are illustrated.

संदर्भ

१. मुजुमदार, पोतदार (संपा), पुणे नगर संशोधनवृत, शके १८७३ खंड ४, पृ ३.
२. वाड ग. चि. सवाई माधवराव पेशवा, सातारचे राजे आणि पेशव्यांच्या रोजनिशीतील निवडक कागद, क्र ३ संपा., के बी मराठे, पुणे, १९०८, पृ ३४९–५२.
सरदेसाई गो. स., पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ४५, मुंबई, १९३४, पृ, ११५.
३. पेशवे दप्तर, अप्रसिद्ध रुमाल क्र ५६७, पु १, पत्र ५.
४. हिंगवे कृ. शं., पराग मासिक, मार्च १९४८, पृ २९.
५. वाड ग. चि., समारो, भाग ३, पुणे, १९०८, पृ ३४९-५२.
सरदेसाई गो. स., पे. द., खंड ४५, मुंबई, १९३४, पृ, ११५.
पे. द., अप्र रु. क्र १९, पु ८, पत्र ११६४०.
६. मेणवली संग्रह, अप्रसिद्ध रुमाल, डेक्कन कॉलेज, रु. क्र ४६, फा. १ पत्र २२
७. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा. १, पत्रे १९, २१, २२, २३, २४;
पे. द. अप्र. रु. क्र ५६८, पत्र क्र. नाही.
८. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा. १, पत्र १.
सरदेसाई गो. स.. मराठी रियासत, मध्य विभाग ४, पुणे, १९२५, पृ १३५.
९. पे. द., अप्र रु. १९, पु ५, पत्र १०८७९.
१०. पे. द., अप्र रु. १९, पत्र क्र. नाही.
११. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा १, पत्रे ४५, ५०,
पे. द., अप्र रु. ५६८.

१२. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा १, पत्रे २, ६, ११, ३७, ४६, ४९.
१३. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा १, पत्रे २०, २३, २६, २८.
मे. सं. डे. कॉ., रु. ७३, फा. १, पत्र १२३.
मे. सं. डे. कॉ., रु. ६९, फा. १, पत्र ३०.
१४. पे. द., अप्र रु. ५७१.
१५. पे. द., अप्र रु. ५६७, ५६८, ५६९.
१६. पे. द., अप्र रु. ५६८.
१७. मे. सं. डे. कॉ., रु. ४६, फा. १, पत्र ५०.
१८. पारसनीस द. व., पूना इन बाय गॉन डेज, पृ २६०.
१८ (अ). मे. सं. डे. कॉ., रु. ८७, फा. ५, पत्र ९५,
१९. पे. द., अप्र. रु. १९, पु. ८, पत्र ११९४०

BISM Quarterly 64 : 1, July 1985

Travellers' account of the life-style of the Portuguese in India.

K. S. Shastry
Poona University, Pune

